Hero
Destini 125




संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा



Hero
Destini 110


हिरोची स्कूटर स्कूटरचा हिरो
डेस्टिनी सिरीज़ पासून सुरू होते ₹75150*
कॅश डिस्काउंट ₹3000*

SAIDEEP HERO | 9289922485, ILAKSHI AUTO SALES | 9289922398



रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, गुरुवार दि. १२.०३.२०२६ | अंक नं. २८४ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020



समता पतसंस्था
नो रिस्क, रिटर्न्स फिक्स
११००+ कोटींच्या ठेवी
ठेवींवर मिळवा १०% पर्यंतचे व्याज
लिक्विडिटी बेस प्रोटेक्शन स्कीम
अंतर्गत ठेवीदारांच्या ठेवी, पूर्णपणे सुरक्षित.
संपर्क : ७७२२ ०१० २२२
४० वर्षे ग्राहकांच्या विश्वासाची!

स्वप्नवत ऑफर... स्वप्नवत सफर...
FREE हनिमून टूर
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

92.5% शुध्द चांदीमधील अप्रतिम दागिन्यांची असंख्य व्हरायटी
लेडिज अंगठी | फॅन्सी टॉप व रिंगा | लेडिज ब्रासलेट | फॅन्सी गंठन व नेकलेस | कडली | घड्याळ
चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
फॅन्सी पायलच्या 3000 पेक्षाही अधिक डिझाईन उपलब्ध



चला स्विमिंग ला...
स्विमिंग सुट, गॉगल, स्विमिंग कॅप, बरमुडा स्विमिंग लेगींग्ज टॉप, व बरेच काही
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
वशोदानगर, पाईपलाईन रोड,
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505


# गॅसअभावी अहिल्यानगर एमआयडीसीतील ३०० उद्योग ठप्प

## उद्योगांना मोठा आर्थिक फटका, ३ हजार कामगारांवर बेरोजगारीची कुऱ्हाड?

नगर – आखाती देशांमध्ये सुरु असलेल्या युद्धाचे पडसाद आता स्थानिक उद्योगांवर उमटू लागले आहेत. इंडस्ट्रियल गॅसचा तुटवडा निर्माण झाल्यामुळे अहिल्यानगर एमआयडीसीमधील तब्बल ३०० उद्योगांची चाके थांबली आहेत. त्यामुळे जवळपास ३ हजार कामगारांचे, काम बंद पडण्याची शक्यता आहे. गेल्या तीन दिवसांपासून गॅस उपलब्ध नसल्याने उत्पादन प्रक्रिया पूर्णपणे ठप्प झाली आहे. एमआयडीसी परिसरातील अनेक उद्योगांमध्ये उत्पादनासाठी इंडस्ट्रियल गॅस अत्यावश्यक असतो. विशेषतः इलेक्ट्रिकल मोटार निर्मिती करणाऱ्या कंपन्यांमध्ये गॅसवर आधारित प्रक्रिया मोठ्या प्रमाणावर केली जाते. मात्र गॅसचा पुरवठा खंडित झाल्याने मोटार तयार करण्याचे विभागच बंद पडले आहेत.

काही कंपन्यांमध्ये छोट्या प्रोजेक्टअंतर्गत सुमारे ७०० मोटारी तर मोठ्या कंपन्यांमध्ये ७ हजारांपर्यंत मोटारींचे उत्पादन केले जाते. पण गॅसच्या कमतरतेमुळे उत्पादन पूर्णपणे ठप्प झाल्याने उद्योगांना आर्थिक फटका बसत आहे. उद्योगांतील कामकाज थांबल्याने ३ हजार कामगारांवर बेरोजगारीचे संकट ओढवले आहे. ही परिस्थिती अशीच राहिली तर हजारो कामगारांच्या रोजगारावर गदा येण्याची शक्यता उद्योजकांनी व्यक्त केली आहे. परिस्थिती गंभीर होत असल्याने इंडस्ट्रियल गॅसचा पुरवठा तातडीने सुरळीत करावा, अशी मागणी उद्योजकांनी सरकारकडे केली आहे.

### हॉटेल व्यवसाय बंद होण्याची शक्यता

व्यावसायिक गॅस सिलेंडर उपलब्ध नसल्याने शहरातील हॉटेल व्यवसायिकांपुढे मोठे संकट उभे राहिले आहे. सध्या काही हॉटेल्समध्ये स्टॉकमध्ये असलेल्या सिलेंडरवरच व्यवसाय सुरू आहे. मात्र येत्या दोन दिवसांत नवीन सिलेंडर उपलब्ध न झाल्यास अनेक हॉटेल्स बंद ठेवण्याची वेळ येऊ शकते. प्रशासनाकडून व्यावसायिक गॅस टाक्या उपलब्ध असल्याचा दावा केला जात असला तरी प्रत्यक्ष ग्राउंड लेव्हलवर हॉटेल व्यवसायासाठी लागणाऱ्या टाक्या मिळत नसल्याचे हॉटेल व्यावसायिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे लवकरात लवकर गॅस टाक्यांचा पुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी हॉटेल व्यवसायिकांनी केली आहे.


नवीपेठ / नेता सुभाष चौक येथे रोडटच (तयार दुकान) देणे
अहिल्यानगर शहरात मुख्य बाजार पेठेत नवीपेठ येथे ११०० व नेता सुभाष चौकात ८०० चौ. फुट (तयार दुकान) योग्य किंमत आल्यास देणे आहे. ज्वेलरी, इलेक्ट्रॉनिक्स, मोबाईल शॉपी या सारख्या इतर सर्व व्यवसायासाठी उपयुक्त.
-: संपर्क :-
8208878322 / 9850507313

कसं शिकायचं? ते शिकूया!
अहिल्यानगर मध्ये आपल्या सोयीच्या ठिकाणी!
विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष व मूलभूत ज्ञानासाठी
दर रविवारी दोन तास
Abhinav - The Thinking & Exploration Club
अधिक माहितीसाठी
8329842459



HAPPY गुढी पाडवा
TVS
मंगलक्षण पाडव्याचा, टीव्हीएस वाहन खरेदीचा..
गुढीपाडव्याच्या या मंगलक्षणी, आपल्या आवडत्या टीव्हीएस वाहनांवर स्वार होवूया, सणाचा आनंद अधिक द्विगुणित करूया.

TVS Sport माइलेज का बाप
TVS Jupiter 125 ZYADA SE BHI ZYADA
TVS iQUBE
DISCOUNT ₹3000* (For Redeon & Sport)
DISCOUNT ₹1500* (For State Government Employees)
DISCOUNT ₹4000 TO 8000* (For Apache)
FUNDING 85% TO 100%
EVERY CUSTOMER SURPRIZE - GIFT -
Conditions Apply*
सेवा तत्परतेची, परंपरा विश्वसनीयतेची..
भनसाळी TVS
सक्कर चौक, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
7844817817 / 7057817817 / 8087917817


लोकसेवेचे व्रत आपण जीवनभर जपले,
स्वतः चंदनापरी झिजून इतरांना सुगंध देत राहीले,
सुसंस्कार, समय सूचकता, सर्वांवर असलेली प्रेमभावना
यामुळेच आपण वंदणीय झाले...



स्व. अशोकराव तुकाराम गोरे
विमा विकास अधिकारी । स्व.दि. १२/३/२०२४
द्वितीय पुण्यस्मरण

शोकाकूल
सुरेखा अशोकराव गोरे
डॉ. सुदर्शन अशोकराव गोरे
डॉ. केतन अशोकराव गोरे
समस्त गोरे परिवार
गोरे डेंटल क्लिनिक माळीवाडा । तोफखाना । निर्मलनगर, अहिल्यानगर

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com





एलपीजी गॅस भरण्यासाठी सक्कर चौकातील पंपावर रिक्षांच्या लागलेल्या लांबच लांब रांगा. (छाया – अमित मन्यार)

# 'एलपीजी गॅस'चा नगरमध्ये तीव्र तुटवडा; पंपावर लागल्या रिक्षांच्या लांबच लांब रांगा

नगर – आखाती देशांमधील युद्धजन्य परिस्थितीचा फटका आता घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक गॅस ग्राहकांच्या पाठोपाठ रिक्षाचालकांनाही बसू लागला असून, एलपीजी गॅसचा तीव्र तुटवडा निर्माण झाला आहे. गॅस भरण्यासाठी शहरातील गॅस पंपावर रिक्षांच्या लांब रांगा लागल्या असून मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे.

पश्चिम आशियामध्ये अमेरिका इस्त्राईल विरुद्ध इराण या देशांमध्ये युद्धाचा भडका उडाला मात्र याच युद्धाची झळ आता जगाला बसली आणि त्यामुळे इंधन टंचाई निर्माण होईल अशी शक्यता वर्तवण्यात येते आणि याचीच चर्चा सध्या सर्वसामान्य नागरिकांमध्येही रंगते पण या चर्चा अफवांमध्ये बदलल्या आणि राज्यभरातल्या अनेक भागांमध्ये गॅस सिलेंडर खरेदीसाठी मोठ्या रांगा लागल्याचे पाहायला मिळत आहे. व्यावसायिक आणि औद्योगिक गॅस वर सरकारने निर्बंध घालत घरगुती गॅस ला प्राधान्य दिले आहे. त्यामुळे अनेक हॉटेल्स तसेच एमआयडीसीतील उद्योगधंदे बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. त्यातच आता एलपीजी गॅस वर चालणाऱ्या रिक्षांना ही याची झळ बसायला लागली आहे.

नगर शहरात प्रवासी वाहतूक करणाऱ्या अनेक रिक्षा या एलपीजी गॅस वर चालणाऱ्या आहेत. शहर परिसरात एमआयडीसी, सक्कर चौक आणि जुन्या बसस्थानकाशेजारी असे ३ एलपीजी गॅस पंप आहेत. त्यातील बसस्थानकाशेजारील पंप रस्त्याचे काम सुरु असल्याने सध्या बंद आहे. त्यामुळे शहरासह भिंगार, केडगाव येथील रिक्षा चालक सक्कर चौक परिसरात असलेल्या पंपावर गर्दी करत आहेत. पहाटेपासूनच रिक्षाचालकांना रांगेत उभे असून तासनतास प्रतीक्षा करावी लागत आहे. नवीन टिळक रस्त्यावर सक्कर चौकापासून नंदनवन लॉन पर्यंत तर स्टेशन रस्त्यावर उड्डाणपुलाखाली रिक्षांच्या लांबच लांब आखाती देशांमधील युद्धजन्य परिस्थितीमुळे गॅस पुरवठा अचानक विस्कळीत झाल्याने रिक्षावर अवलंबून असणाऱ्या शेकडो कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर झाला आहे. शहरात गॅस मिळणार की नाही, या भीतीने रिक्षाचालक हवालदिल झाले आहेत.

### ४ दिवसांत किलोमागे २० रुपयांची वाढ

गॅसच्या तुटवड्याचा फायदा घेत ४ दिवसांपूर्वी ६५ रुपये किलो दराने मिळणारा एलपीजी गॅस २ दिवसांपूर्वी ७५ रुपये किलो दराने तर १२ मार्च रोजी ८५ रुपये दराने विक्री होत असल्याचा आरोप रिक्षाचालकांनी केला आहे. चढ्या दराने विक्री होत असल्याने सामान्य रिक्षाचालकांना आर्थिक फटका बसत आहे. गॅस मिळाला नाही तर आम्ही आमचा संसार कसा चालवायचा? सरकारने तातडीने यावर तोडगा काढावा, अशी मागणी रिक्षाचालकांनी केली आहे.या संदर्भात पुरवठा विभागाने गॅस पंपावर लक्ष द्यावे आणि ही अन्यायकारक दरवाढ रोखावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

## अपघातामुळे बेशुद्ध पडलेल्याचा अज्ञात व्यक्तीने घेतला चावा

नगर – नगर तालुक्यातील खडकी गावच्या शिवारात एक विचित्र घटना समोर आली आहे. अपघातामुळे रस्त्यात बेशुद्ध पडलेल्या एका तरुणाचा, तो असहाय्य असताना अज्ञात व्यक्तीने चावा घेतल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

पारनेर तालुक्यातील अस्तगाव येथील रहिवासी शामुवेल अशोक ठोंबरे हा तरुण बाबुर्डी बेंद येथील एका हॉटेलमध्ये जेवण करण्यासाठी गेला होता. जेवण आटोपून घरी परतत असताना खडकी शिवारात त्याचा अपघात झाला. या अपघातामुळे शामुवेल रस्त्यावरच बेशुद्ध पडला होता. तो शुद्धीवर नसल्याचा फायदा घेऊन कोण्या एका अज्ञात व्यक्तीने त्याच्या डाव्या खांद्याजवळ जोरात चावा घेतला. शुद्धीवर आल्यानंतर हा प्रकार लक्षात येताच शामुवेल ठोंबरे याने पोलीस ठाण्यात धाव घेऊन फिर्याद दिली. पोलिसांनी या घटनेचे गांभीर्य ओळखून भारतीय न्याय संहितेच्या कलम ११७ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार खरात हे करत आहेत. भररस्त्यात जखमी अवस्थेत असलेल्या व्यक्तीसोबत घडलेल्या या अघोरी प्रकारामुळे परिसरात आश्चर्य व्यक्त होत असून, पोलीस आता त्या अज्ञात विकृत व्यक्तीचा शोध घेत आहेत.

## जमुनाबाई परदेशी यांचे वृद्धापकाळाने निधन

भिंगार – घासगल्ली भिंगार येथील रहिवासी श्रीमती जमुनाबाई



परदेशी (वय ८४) यांचे ११ मार्च रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर १२ मार्च रोजी शुक्लेश्वर मंदिरा जवळील भिंगार अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुले, १ मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. स्व. बंडुलाल दुर्गादास परदेशी यांच्या त्या पत्नी तर हुकुमचंद व रतनलाल परदेशी यांच्या मातोश्री होत.

## शांतीलाल संकलेचा यांचे अल्प आजाराने निधन

नगर – पाईपलाईन रोड सावेडी येथील रहिवासी शांतीलाल



पनालाल संकलेचा (वय ७९) यांचे १० मार्च रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर ११ मार्च रोजी नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, ३ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. इस्टेट एजन्सीचे सतिश संकलेचा यांचे ते वडील होत.

## अभिषेक कळमकर याचा अटकपूर्व जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळला

नगर – माजी महापौर अभिषेक कळमकर याच्या विरोधात तरुणीला नोकरी लावण्याचे आमिष दाखवत अत्याचार केल्याचा गुन्हा दाखल झाल्यानंतर या गुन्ह्यात अटकपूर्व जामीन मिळण्यासाठी त्याच्या वतीने जिल्हा न्यायालयात करण्यात आलेला अर्ज जिल्हा व सत्र न्यायधीश डॉ.यु.जे.मोरे यांनी १२ फेब्रुवारी रोजी फेटाळून लावला आहे.

याबाबत शिरूर (जि.पुणे) येथील एका २५ वर्षीय विवाहित महिलेने २१ फेब्रुवारी रोजी पहाटे एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली होती. या फिर्यादी वरून हा गुन्हा दाखल झालेला आहे. फिर्यादीत नमूद केल्याप्रमाणे, संबंधित महिला खासगी कामानिमित्त अहिल्यानगर येथे आली होती. सोशल मीडियावरून तिने अभिषेक कळमकर याचा मोबाईल क्रमांक मिळवून नोकरीसंदर्भात संपर्क साधला. त्यावेळी त्याने नोकरी मिळवून देण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर काही दिवसांनी अभिषेकने एमआयडीसी परिसरात आपली शाळा असल्याचे सांगून शाळा दाखविण्याच्या बहाण्याने तिला बोलावले. तिला एका काळ्या रंगाच्या वाहनात बसवून एमआयडीसीकडे घेऊन गेला. वाहनात असताना तिला शीतपेय दिल्यानंतर गुंगी आल्यासारखे झाले. त्यानंतर सुमसाम ठिकाणी वाहन थांबवून जबरदस्ती केल्याचा आरोप महिलेने केला आहे. तसेच, या घटनेबाबत कोणाला सांगितल्यास नोकरी मिळणार नाही, अशी धमकी दिल्याचेही तिने म्हटले आहे. त्या नंतर १८ फेब्रुवारीला शिरूर येथील एका लॉज वर बोलावून पुन्हा अत्याचार केल्याचे या फिर्यादीत म्हंटलेले आहे.

हा गुन्हा दाखल झाल्यापासून अभिषेक कळमकर फरार आहे. त्याच्या वतीने ॲड. विकास ढोकळे यांच्या मार्फत जिल्हा न्यायालयात अटक पूर्व जामीनासाठी अर्ज करण्यात आला होता. त्याची सुनावणी जिल्हा व सत्र न्यायधीश डॉ.यु.जे.मोरे यांच्या समोर झाली. पिडीतेचे वकील ॲड.विजय गुंदेचा यांनी अटकपूर्व जामीन देण्यास जोरदार विरोध दर्शवत हा गंभीर स्वरूपाचा गुन्हा असल्याने जामीन देवू नये असा युक्तिवाद केला. फिर्यादी पक्षाचा युक्तिवाद ग्राह्य धरत न्या. मोरे यांनी हा अर्ज फेटाळून लावला आहे.

## शहरातील रस्त्यांच्या कामासाठी २५ कोटी रुपयांचा निधी मंजूर



आमदार संग्राम जगताप

नगर – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार तसेच सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्या सहकार्याने नगर शहर व केडगाव मधील रस्त्यांच्या व पुलाच्या कामासाठी २५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे, अशी माहिती आमदार संग्राम जगताप यांनी दिली.

अधिक माहिती देताना आ.जगताप म्हणाले, राज्य शासनाकडे केलेल्या पाठपुराव्यामुळे शहरातील विकासकामांसाठी सातत्याने निधी मंजूर होत आहे. नव्याने मंजूर झालेल्या २५ कोटी रुपयांच्या निधी मधून केडगाव वेश ते देवी मंदिर ते रेल्वे अंडर पास रस्त्याच्या कॉँक्रिटीकरण कामासाठी ७ कोटींचा निधी, तसेच भूषणनगर लिंक रोड वरील डागवाले फार्म जवळील पुलाच्या रुंदीकरण व सुशोभीकरण कामासाठी ३ कोटींचा निधी, तसेच नगर शहरातील पुना रोडवरील उड्डाणपुलाखालील कोठी चौक ते एसबीआय चौक पावन हनुमान मंदिर पर्यंतच्या रस्त्याच्या कॉँक्रिटीकरण व पेव्हिंग ब्लॉकच्या कामासाठी १५ कोटी रुपये निधी असा एकूण २५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

राज्यातील महायुती सरकारच्या सहकार्याने नगर शहरात मोठ्या वेगाने विकासकामे होत आहेत. यासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभत आहे. त्यामुळे शहरातील मूलभूत प्रश्न मार्गी लागत आहेत, असेही आमदार संग्राम जगताप यांनी नमूद केले.

## अनिल कुलकर्णी यांचे दु:खद निधन



नगर – दूरगाव (ता. कर्जत) येथील सेवानिवृत्त पोस्ट मास्टर अनिल (काका) भास्कर कुलकर्णी (वय ७३) यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले.

त्यांच्यामागे पत्नी, तीन मुली, पुतणे, जावई, सुना, नातवंडे असा परिवार आहे. पुरोहित प्रवीण कुलकर्णी यांचे ते काका होत.

## हर्षल येळवंडे यांचे आकस्मिक निधन



नगर – नागरदेवळे येथील रहिवासी हर्षल परशुराम येळवंडे (वय २७) यांचे पहाटे ५ वा. आकस्मिक निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर भिंगार अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, वडील, भाऊ, पत्नी, १ मुलगी असा परिवार आहे.

## श्रीमती प्रमिलाबाई उमाप यांचे निधन

नगर – गोगलगाव (ता.नेवासा) येथील रहिवासी श्रीमती



प्रमिला भाऊराव उमाप (वय ७१) यांचे ११ मार्च रोजी पहाटे निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर गोगलगाव कब्रस्तान येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, २ मुली, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. नंदू उमाप यांच्या त्या मातोश्री होत.

## महानगरपालिका हद्दीतील कुळांना (मालमत्ता धारकांना) भाड्याच्या उत्पन्नावर आकारणी न करता क्षेत्रफळानुसार आकारणी करण्यात यावी

### शिवसेनेचे मनपा आयुक्त यांना निवेदन

नगर – महानगरपालिका कार्यक्षेत्रातील इमारत व जमिनीचे पुर्नमुल्यांकण करणेकामी मे. सि.ई. इन्फो सिस्टीम लि. या संस्थेची नियुक्ती केली होती. त्यानुसार सदरील संस्थेने पुर्नमुल्यांकण केलेले आहे. सदर मुल्यांकन करताना महानगरपालिकेने भाडेकरी देत असलेल्या भाड्यावर कर आकारणी करीता कर योग्य मुल्य निश्चित केलेले असून त्यानुसार कुळांना (मालमत्ताधारक) नोटीसा पाठविलेल्या आहेत.




अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील कुळांना (मालमत्ता धारक) भाड्याच्या उत्पन्नावर आकारणी न करता क्षेत्रफळानुसार आकारणी करण्यात यावी या मागणीचे निवेदन शिवसेनेच्यावतीने आयुक्त यशवंत डांगे यांना देण्यात आले.

अहिल्यानगर शहरातील मालमत्ता धारकाचे एक उदाहरण म्हणून तळ मजला, ३ रुम व पहिल्या मजला ३ रुम असे एकुण आर.सी.सी. बांधकाम असलेले ६० चौ.मी. क्षेत्रफळाचे घर हे फक्त निवासी वापरासाठी असल्यास शहरामध्ये असलेल्या दरानुसार त्याचे करयोग्य मुल्य रक्कम रु. ६००० येत आहे. त्यानुसार सदरील मालमत्ता धारकाला ४३ टक्के सर्व प्रकारचे कर व घनकचरा कर रु. ४८० असे एकुण ३०६० घरपट्टी आकारणी केली जाते. परंतु सदर मालमत्ताधारक तळमजला तीन रुम स्वतः वापरतो व पहिला मजला तीन रुम रु. १०,००० महिना भाड्याने स्वतःच्या उदरनिर्वाहासाठी दिलेला आहे. या पहिल्या मजल्यावरील तीन रुमच्या भाड्यानुसार वार्षिक कर योग्य मुल्य हे रु. १,०८,००० इतके महानगरपालिका घरपट्टी आकारणीकरीता निश्तीत करते, तसेच त्यामध्ये तळ मजल्यावरील तीन रुमचे कर योग्य मुल्य रु. ३००० समाविष्ट करुन एकुण करयोग्य मुल्य रु. १,११,००० वर ४३ टक्के कर व घनकचरा कर रु. ४८० असे एकुण ४८००० इतकी घरपट्टी आकारणी केली जाते. यामुळे मालमत्ता धारकाचे उत्पन्नाचे साधन म्हणून तयार केलेल्या घरापासून त्याच्यावर मोठ्याप्रमाणात कर आकारणी होत असल्याचे निदर्शनास येत आहे.

अहिल्यानगर शहरामध्ये उद्योग धंदे, कंपन्या व्यवसाय हे अल्प प्रमाणात आहेत, तसेच कंपन्यामध्ये नोकरी करत असलेले व काही कर्मचारी यांना पेन्शन मिळत नसल्यामुळे हे मध्यमवर्गीय व व्यवसायीक वृद्धापकाळाचे उत्पन्नाचे साधन निर्माण होण्याकरीता कर्ज काढुन घर बांधतात यामधील काही भाग उत्पन्न मिळण्याकरीता भाड्याने देतात. तसेच शहरामध्ये बऱ्याच मालमत्ता धारकांचे उत्पन्न हे मोठ्या प्रमाणात भाड्यावर अवलंबून असल्याने त्यांचा उदरनिर्वाह त्यावर होत असतो. परंतू वरील घरपट्टी आकारणीचा अंदाज केलेले उदाहरण पाहिले असता उत्पन्नाच्या ५० टक्के उत्पन्न हे महानगरपालिका वसुल करत असल्याचे निदर्शनास येते. उरलेल्या ५० टक्के उत्पन्नात मालमत्ता धारकाला मिळालेल्या उत्पन्नातून लाईट बील, आयकर, मेन्टेनन्स, कर्ज हप्ता व इतर खर्च करणे त्याला शक्य होत नाही. त्याचप्रमाणे भाडेकरी हा वर्षभर राहिल याची खात्री नसते, तो जर सहा महिने राहिला तरी महानगरपालिका पुर्ण वर्षाच्या भाड्यावर आकारणी करत असल्याने मालमत्ता धारकास मिळालेले भाडे घरपट्टी पोटी संपुर्ण रक्कम भरावी लागते, त्यामुळे त्याला रुपयाही उत्पन्न मिळत नाही. तरी बऱ्याच महानगरपालिकेमध्ये भाड्याचे उत्पन्नावर आकारणी होत नसल्याने महानगरपालिकेने मालमत्ता कराची आकारणी करताना ते इमारतीच्या क्षेत्रफळानुसार करावी. मालमत्ता धारकाच्या भाड्याने दिलेल्या रकमेवर करु नये, तसेच भाड्याचे दराने केलेली आकारणी रद्द करुन मालमत्ता धारकांना घरपट्टी भरण्यास परवडेल अशा पद्धतीने आकारणी करणेबाबत व संबंधीत एजन्सीला (मे. सि.ई. इन्फो सिस्टीम लि.) या रिव्हीजन पोटी रु.१५ कोटी ही किंमत भविष्यात महानगरपालिकेला द्यावी लागणार असून ती रक्कम जनतेच्या वसूल केलेल्या करातून द्यावी लागणार असून जनतेवर हा बोजा टाकण्याचे काम महानगरपालिका करत आहे. महानगरपालिकेची स्थायी समितीची विशेष सर्वसाधारण सभा घरपट्टी या विषयासाठी बोलविण्यात अशी मागणी शिवसेनेच्या वतीने करण्यात आली आहे.

यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल शिंदे, शहर प्रमुख संभाजी कदम, बाळासाहेब बोराटे, दत्तात्रय कावरे, सचिन जाधव, संजय शेंडगे, अनिल लोखंडे, नवनाथ कातोरे, परेश लोखंडे, काका शेळके, प्रणव भोसले, अरुण झेंडे, अभिजित अष्टेकर, गणेश झिंजे, कैलास शिंदे, विजय बोरुडे, चेतन शिरसुल, प्रताप गडाख, अंगत महानवर, यशराज खेरे आदी उपस्थित होते.



## हनुमान चालिसा पाठ

**शुक्रवार दि. १३/३/२०२६**
**रात्री ८.३० ते १०.३०**

**श्री दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळ, सर्जेपुरा, अहिल्यानगर**

**किरण ब्राम्हणकर आणि संजय मंचरे परिवार,** सहकार्य स्वामी प्रतिष्ठाण (बोल्हेगाव) प्लॉट नं.१६, राघवेंद्र स्वामी नगर, शिवसेना ऑफिस, किरण ब्राम्हणकर ९८२२४९९२१०, संजय मंचरे परिवार ९३७००७००१४

**मंगल भक्त सेवा मंडळ, मंगल दत्तक्षेत्र, एम.आय.डी.सी.**

**महावीर रसिकलाल बोरा,** समता कॉलनी, विनायकनगर, महावीर बोरा ९६८९६४५२६५, प्रीतम चोरडीया ९४२२०८२६९७

**श्री लक्ष्मीनारायण सत्संग मंडळ, सारडा लेन, गंजबाजार**

**श्री सारसनगर माहेश्वरी समाज,** श्री. रामदेवरा दरबार, चिपाडे मळा, सारसनगर ९८२२४११३३२, ९१६८११७४०२

**श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ (ट्रस्ट) नवीपेठ**

**तोफखाना मित्र मंडळ एवम् श्री. राजूशेठ बळीराम आडेप परिवार,** भराड गल्ली जवळ, तोफखाना

**श्री संकट मोचन हनुमान मंडळ, श्री रामदेवरा दरबार, सारसनगर**

**श्री संकट मोचन हनुमान मंडळ,** श्री रामदेवरा दरबार, सारसनगर

## पैशांच्या वादातून तरुणाच्या डोक्यात मारला काचेचा ग्लास

नगर– कामाचे थकीत पैसे मागितल्याच्या कारणावरून झालेल्या वादात एका तरुणाच्या डोक्यात काचेचा ग्लास मारून त्याला गंभीर जखमी केल्याची घटना नगर तालुक्यातील नांदगाव शिवारातील गणपावडर हॉटेल येथे घडली. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी दत्तु गिताराम जाधव (वय ३०,रा. धामोरी, ता.राहुरी) हे त्यांच्या मित्रासोबत हॉटेलमध्ये चहा पित असताना आरोपी राजु रमेश ससाणे (रा. धामोरी, ता. राहुरी) तिथे आला. त्याने जाधव यांच्याकडे कामाच्या पैशांची मागणी केली. त्यावर जाधव यांनी 'सध्या माझ्याकडे पैसे नाहीत, दोन–तीन दिवसात देतो' असे सांगितले. याचा राग अनावर झाल्याने आरोपीने हातातील काचेचा ग्लास थेट जाधव यांच्या डोक्यात मारला. या हल्ल्यात जाधव गंभीर जखमी झाले असून, आरोपीने त्यांना शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली.

सदर घटना ७ मार्च रोजी घडली होती. सुरुवातीला या घटनेची नोंद राहुरी पोलीस ठाण्यात करण्यात आली होती. मात्र, तपासादरम्यान घटनास्थळ एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत असल्याचे निष्पन्न झाल्याने हा गुन्हा आता वर्ग करण्यात आला आहे. सहायक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी आणि पोलीस हवालदार सचिन अडबल पुढील तपास करत आहेत.

## ग्राहकांनी 'थकीत वीजबाकी' तत्काळ भरावी : धीरज दायमा

नगर – शहरामध्ये महावितरण कंपनीच्या माध्यमातून सर्व वीज ग्राहकांच्या घरांना व आस्थापनांना केंद्र शासनाच्या योजना अंतर्गत स्मार्ट मीटर बसविण्यात येत आहेत. मात्र जे ग्राहक वीज थकबाकीदार आहेत अशांची वीज खंडीत करण्यात येणार आहे. थकबाकी भरल्यावर व स्मार्ट मीटर लावल्यानंतरच वीजपूर्ववत होणार आहे. त्यामुळे सर्व थकबाकी ग्राहकांनी आपली थकबाकी त्वरित भरावी, असे आवाहन जिल्हा ग्राहक संघटनेचे धीरज दायमा यांनी पत्रकाद्वारे केले आहे.

सध्या शहरातील सुमारे ४६ हजार ग्राहकांचे स्मार्ट मीटर बसवण्याचे काम पूर्ण झाले असून उर्वरित ग्राहकांचीही लवकरच स्मार्ट वीज मीटर बसवण्यात येणार आहे. ज्या ग्राहकांचे स्मार्ट मीटर अद्याप बसवलेले नाही आणि ज्या ग्राहकांनी ४५ दिवसापासून वीज बिल भरलेले नाही, अशा सर्व ग्राहकांची वीज खंडित करून जुने मीटर काढून घेण्याचे काम महावितरणने खाजगी कंत्राटदारामार्फत सुरु केले आहे. थकबाकी बिल भरल्यानंतर केवळ स्मार्ट मीटर लावूनच वीज ग्राहकांना वीज पुरवठा सुरू करण्याचे कडक निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यामुळे ग्राहकांनी तात्काळ थकीत वीज बिल भरून गैरसोय टाळावी, असे आवाहन दायमा यांनी केले आहे.

## कत्तलीसाठी चालवलेल्या जनावरांचा टेम्पो पकडला

### ४ गीर गायींची पोलिसांनी केली सुटका, दोघांवर गुन्हा दाखल

नगर – नगर–पुणे महामार्गावर केडगाव बायपास परिसरात कोतवाली पोलिसांनी कारवाई करत कत्तलीच्या उद्देशाने बोलेरो पिकअपमधून दाटीवाटीने नेल्या जाणाऱ्या चार गिर गायींची सुटका केली आहे. याप्रकरणी पोलिसांनी साडेतीन लाखांहून अधिक रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून दोन जणांविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.

रामवाडी येथील गोरक्षक रोहन कानिफनाथ जगताप यांनी या संदर्भात फिर्याद दिली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी शहानुर रेहमान सय्यद (३३, रा. घासगल्ली, अहिल्यानगर) हा त्याच्या ताब्यातील महिंद्रा बोलेरो पिकअप (क्र. एमएच ०४ ए वाय११०१) मधून मुक्या जनावरांना अत्यंत क्रूरपणे बांधून घेऊन जात होता. आरोपी असिफ शब्बीर शेख (रा. कसाई गल्ली) याच्या सांगण्यावरून या गायी कत्तलीसाठी नेल्या जात असल्याचे तपासात समोर आले आहे.

निल हॉटेलसमोर ११ मार्च रोजी पहाटे ३ च्या सुमारास सापळा रचून पोलिसांनी ही कारवाई केली. यामध्ये अडीच लाख रुपये किमतीचे वाहन आणि सुमारे १ लाख ५ हजार रुपये किमतीच्या चार गिर गायी असा एकूण ३ लाख ५५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. कोतवाली पोलीस ठाण्याचे पो. नि. संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार संतोष लगड या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# गृहिणी

## आरोग्य

### प्या रुद्राक्षाचे पाणी...

धार्मिक दृष्टिकोनातून रुद्राक्ष जितका महत्त्वाचा आहे तितकाच त्याचा वापर आरोग्यासाठीही तितकाच फायदेशीर आहे. रुद्राक्ष धारण करण्याव्यतिरिक्त, त्याचे पाणी पिणे फायदेशीर असल्याचे म्हटले जाते. जर तुम्ही येथे नियमितपणे रुद्राक्षाचे पाणी प्यायले तर तुम्हाला तणाव आणि चिंता या समस्यांपासून आराम मिळतो. या विशेष प्रकारचे पाणी तुमच्या आतील अस्वस्थता आणि मानसिक ताण शांत करण्याचे काम करते. रुद्राक्षाचे पाणी प्यायल्याने चांगली झोप येते. जर तुमची झोप चांगली असेल तर इतर आरोग्य समस्या तुम्हाला त्रास देणार नाहीत. या साठी सर्वप्रथम रात्रभर रुद्राक्ष पाण्यात भिजवा आणि सकाळी उठून ते पाणी गाळून रिकाम्या पोटी प्या. हे लक्षात ठेवा की, रुद्राक्ष खरे असावे. रुद्राक्ष शुद्ध असल्यास त्याचे औषधी गुणधर्म शरीराला फायदे देतात.

## पाककला

### खापरोळी

**साहित्य** : तांदूळ: २ वाट्या (शक्यतो जुना किंवा रेशनचा तांदूळ), उडीद डाळ: अर्धी वाटी, मेथी दाणे १ छोटा चमचा, मीठ चवीनुसार, तूप भाजण्यासाठी

**'रसा'साठी साहित्य** : ओले खोबरे: १ मध्यम वाटी (खवून घेतलेले), गूळ १ वाटी (किंवा आवडीनुसार कमी-जास्त), वेलची पूड १ छोटा चमचा, मीठ चिमूटभर, पाणी रस करण्यासाठी आवश्यकतेनुसार

**कृती** : तांदूळ आणि उडीद डाळ स्वतंत्रपणे स्वच्छ धुवून ५-६ तास पाण्यात भिजत घाला. डाळीसोबत मेथी दाणेही भिजवा. भिजल्यानंतर पाणी उपसून घ्या आणि मिक्सरला दोन्ही जिन्नस एकदम बारीक (फाईन पेस्ट) वाटून घ्या. हे पीठ एकत्र करून रात्रभर (किंवा ८-१० तास) उबदार ठिकाणी आंबवण्यासाठी ठेवा. (आंबल्यामुळे खापरोळी छान जाळीदार होते). खवलेले खोबरे थोडे पाणी घालून मिक्सरला वाटून घ्या. त्यानंतर त्याचे घट्ट नारळाचे दूध गाळून घ्या. दुसऱ्या एका भांड्यात गुळाचा पाक (किंवा गूळ पाण्यात विरघळून) तयार करा. या गुळाच्या पाण्यात नारळाचे दूध, वेलची पूड आणि चिमूटभर मीठ घालून हलके गरम करा. (जास्त उकळू नका, अन्यथा दूध फाटू शकते). आंबलेल्या पिठात थोडे मीठ आणि गरज असल्यास थोडे पाणी घालून मिश्रण 'डोसाच्या पिठा'पेक्षा थोडे घट्ट ठेवा. लोखंडी तवा किंवा खापराचा तवा गरम करा. त्याला थोडे तूप लावा. एक मोठा चमचा पीठ तव्यावर ओता, पण ते जास्त पसरवू नका. खापरोळी थोडी जाड असावी. वर झाकण ठेवून मंद आचेवर वाफेवर शिजू द्या. खापरोळी एकाच बाजूने भाजली जाते. वरच्या बाजूला छान जाळी पडली की समजावे खापरोळी तयार आहे.

## वास्तू

### समस्या दूर करण्यासाठी

* घराच्या जवळपास वाळून गेलेले झाड असल्यास ते लगेच काढून टाकावे. यामुळे वास्तुदोष वाढतात.

* अडचणी दूर करण्यासाठी रोज सकाळी लवकर उठावे आणि स्नान करून सूर्यदेवाला अर्घ्य अवश्य द्यावे.

* शक्य असल्यास दरवाजाला उंबरा अवश्य बनवावा. यामुळे घरामध्ये कचरा येत नाही. कचऱ्यामुळे वास्तुदोष वाढतात.

## सौंदर्य

शिकाकाई हे नैसर्गिक क्लिंजर आहेत. ते कोणत्याही रासायनिक नुकसानाशिवाय केसांमधील अतिरिक्त तेल काढून टाकतात आणि टाळूला श्वास घेण्यास परवानगी देतात.

## सल्ला

* सुकामेवा टिकण्यासाठी तो रोस्ट करुन बरणीत भरुन ठेवा.

* दूध आणि दुधाचे पदार्थ फ्रिजच्या मागील बाजूस ठेवावेत.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. १३ मार्च २०२६

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, फाल्गुन कृष्णपक्ष, पू.षा.२७।०३, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०५ वा. ३२ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : व्यापारात आपल्या सेवेच्या मोबदल्यात योग्य लाभ मिळेल.

**वृषभ** : आपला एखादा मित्र आपल्या विचारांबद्दल महत्वपूर्ण सल्ला देऊ शकतो. एखादी विषम परिस्थती उद्भवण्याआधी आपली आर्थिक स्थिती तपासून पाहा.

**मिथुन** : काही गोष्टी आपल्या जीवनात आकस्मिकरीत्या आनंद आणतील. आपल्या नवीन आवडींना प्रोत्साहन द्या.

**कर्क** : आजचा दिवस आपणास पैसे मिळवण्याच्या आणि व्यापाराच्या नव्या संधी देईल परंतु घाई करणे अडचणीत टाकू शकते.

**सिंह** : रहाते घर बदलण्यासाठी आजचा दिवस उत्तम आहे. राजकीय व्यक्तींसाठी स्थिती संतोषजनक राहील. आर्थिक लाभ होईल.

**कन्या** : आज आपला जोडीदार किंवा प्रिय व्यक्ती त्याच्या मनातील इच्छा पूर्ण करण्यासाठी आपल्यावर दबाव आणू शकतो.

**तूळ** : घरगुती बाबतीत अधीरता टाळा. आर्थिक बाबतीत काळ अनुकूल आहे. सामाजिक कार्यांमध्ये सहयोग अनुकूल राहील.

**वृश्चिक** : ठरविलेले पूर्ण करण्यासाठी असे प्रसंग प्रेरणादायी ठरतील. यथायोग्य विचार करून कार्य करा.


**धनु** : निष्कारण प्रश्नांचा त्रास राहील. आरोग्याची काळजी घ्या. व्यापार व्यवसायात वेळ साधारण राहील.

**मकर** : आजचा दिवस आपल्या कार्य-योजनेंसाठी आणि सहकार्यांबरोबर आपल्या संबंधांसाठी विधायक ठरेल.

**कुंभ** : अधिक चांगली कामाची स्थिती आणि सामर्थ्य सिद्ध करण्यासाठी चांगली वेळ आहे.

**मीन** : पत्नी व मुले यांच्या सहवासामुळे मानसिक शांतता लाभेल. आपले इप्सित साध्य होण्याचे योग येतील.

## फिल्मीचक्कर क्र. १२२८ सौ. शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) राज बब्बर, दीपक पराशर, झीनत अमान, पद्मिनी कोल्हापुरे यांचा एक चित्रपट ५) ++ तो तेरे आशिक हैं सदीयों पुराने चाहे (गाणे) ७) एक अभिनेत्री ८) मै ++ दो पल का शायर हूं पल दो पल (गाणे) ९) जय ++ शिवशंकर कांटा ना लगे कंकर (गाणे) १०) अभिनेता कमल हसनशी लग्न केलेली एक अभिनेत्री ११) ++ बच्चन (अभिनेत्री) १३) +++ ++++ अँथोनी (चित्रपटाचे नाव) १५) ++ पाटेकर (अभिनेता) १६) मैने ++ किया (चित्रपटाचे नाव) १७) ++ इन टोकियो (चित्रपटाचे नाव)

**उभे शब्द :-** १) धर्मेंद्र, जे. जयललिता, तनुजा, बलराज सहानी यांचा एक चित्रपट २) जितेंद्र, बबिता, मुक्री यांचा गाजलेला एक चित्रपट ३) धर्मेंद्र, सोनू वालिया, नसिरुद्दीन शहा, अमरीश पुरी यांचा एक चित्रपट ४) ++ बलराम (चित्रपटाचे नाव) ६) ++ और गोरी (चित्रपटाचे नाव) ८) जितेंद्र, नंदा यांचा एक चित्रपट ९) ++ ++ ++ खिले (चित्रपटाचे नाव) १२) मेरे ++ (चित्रपटाचे नाव) १३) व्यंकटेश, करिश्मा कपूर, गुलशन ग्रोव्हर, सुरेश ओबेरॉय यांचा एक चित्रपट १४) +++ प्रेम (चित्रपटाचे नाव)

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार** : जेव्हा आपल्याकडे द्यायला काहीच नसते तेव्हा फक्त आधार द्यावा त्यामुळे अडचणीत असलेल्याला ताकद मिळते.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### 'ब्रेन फॉग' म्हणजे काय?

तुमचा मेंदू नीट काम करत नाहीये असे तुम्हाला कधी वाटले आहे का? गोष्टी आठवत नाहीत, लक्ष केंद्रित करता येत नाही आणि मन जड वाटते? जर हो, तर तुम्हाला ब्रेन फॉगचा त्रास होत असेल. हा आजार नाही, तर एक मानसिक आणि न्यूरोलॉजिकल स्थिती आहे जी तुमच्या दैनंदिन जीवनावर परिणाम करू शकते. आजच्या फास्ट-फॉरवर्ड आणि स्क्रीन-चालित काळात, मेंदूतील धुके ही एक सामान्य समस्या बनत आहे. कामाचा ताण, झोपेची कमतरता, खाण्याच्या चुकीच्या सवयी आणि ताणतणाव यासारखी अनेक कारणे याला कारणीभूत ठरतात.

ब्रेन फॉग म्हणजे काय?

ब्रेन फॉग ही एक मानसिक स्थिती आहे ज्यामध्ये एखाद्या व्यक्तीला विचार करण्यास, लक्ष केंद्रित करण्यास, लक्षात ठेवण्यास आणि निर्णय घेण्यास त्रास होतो. हिंदीमध्ये आपण त्याला मानसिक धुके किंवा मेंदूचा थकवा म्हणू शकतो. यामध्ये असे वाटते की मन स्पष्टपणे विचार करू शकत नाही, जणू काही त्यात काही अडथळा आहे. ही समस्या सहसा तात्पुरती असते परंतु जर ती दीर्घकाळ राहिली तर तिचा तुमच्या अभ्यासावर, कामावर आणि नातेसंबंधांवर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. तुम्हाला मेंदूतील धुक्याची ही लक्षणे जाणवू शकतात:

गोष्टी लवकर विसरणे, लक्ष केंद्रित करण्यास असमर्थता, निर्णय घेण्यात अडचण येणे, थकवा किंवा डोकेदुखी जाणवणे, नकारात्मक विचार किंवा मूड स्विंग्स, मेंदूतील धुक्यासाठी उपचार

१. झोपेची गुणवत्ता सुधारा: दररोज रात्री किमान ७ ते ८ तास गाढ झोप घ्या. झोपण्यापूर्वी मोबाईल किंवा स्क्रीनपासून अंतर ठेवा. तुमच्या झोपेच्या वेळा नियमित ठेवा जेणेकरून तुमच्या मनाला विश्रांती मिळेल.

२. निरोगी आहार घ्या: तुमच्या आहारात ओमेगा-३ फॅटी ॲसिड, व्हिटॅमिन बी१२, मॅग्नेशियम आणि अँटीऑक्सिडंट्सचा समावेश करा. हिरव्या भाज्या, फळे, काजू, अंडी, मासे आणि दही यांसारखे पदार्थ मेंदूला ऊर्जा देतात. साखर आणि कॅफिन कमी प्रमाणात घ्या.

३. शारीरिक हालचाल महत्त्वाची आहे: दररोज किमान ३० मिनिटे चालणे, योगा, स्ट्रेचिंग किंवा व्यायाम करा. यामुळे रक्ताभिसरण सुधारते आणि मेंदूला ऑक्सिजनचा पुरवठा होतो.

४. ताणतणाव व्यवस्थापित करा: ध्यान, खोल श्वास आणि माइंडफुलनेस यासारख्या साधनांनी तुम्ही ताणतणाव नियंत्रित करू शकता. दररोज १० ते १५ मिनिटे ध्यान केल्याने मेंदू शांत होतो आणि विचार करण्याची शक्ती वाढते.

डिजिटल डिटॉक्स करा: दर तासाला ५-१० मिनिटे ब्रेक घ्या. आठवड्यातून एकदा डिजिटल डिटॉक्स करा, ज्यामध्ये तुम्ही मोबाईल, लॅपटॉपपासून दूर राहा आणि निसर्गाच्या सानिध्यात जा. स्क्रीनमधून निघणाऱ्या निळ्या प्रकाशाचा मेंदूवर वाईट परिणाम होऊ शकतो.

६. वैद्यकीय सल्ला घ्या: जर ब्रेन फॉग बराच काळ टिकून राहिले आणि घरगुती उपचार काम करत नसतील तर डॉक्टरांना भेटा. थायरॉईड, बी१२ ची कमतरता किंवा न्यूरोलॉजिकल विकारांसाठी चाचणी घेणे महत्वाचे आहे.

## माकड आणि घंटा

अनेक वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एके दिवशी एका चोराने गावातील मंदिराची घंटा चोरली. घंटा चोरल्यानंतर तो जंगलाच्या दिशेने धावत सुटला. एक गुहेमध्ये अराम करीत असलेल्या वाघाने त्या घंटेचा आवाज ऐकला व त्याला तो आवाज खूप आवडला. लवकरच त्याने चोर आणि घंटेला शोधून काढले. वाघाने चोरावर हल्ला केला आणि त्याला ठार केले. घंटा जमिनीवर पडली व वाघ आपली शिकार खाण्यात दंग झाला.

काही दिवसानंतर तिथून एक माकडांची टोळी जात होती. त्यांनी घंटेला पहिले व त्यांना घंटा फारच आवडली.माकड ती घंटा घेऊन खेळू लागले. ते दिवसभर फिरायचे व रात्री घंटा सोबत खेळायचे.

गावातली लोक रोज रात्री येणाऱ्या घंटेचा आवाज ऐकून घाबरत होती.गावातील लोकांना चोराचा मृतदेह सापडल्याने ही बातमी पसरली की, जंगलात कोणीतरी राक्षस राहत आहे. जो लोकांना ठार केल्यानंतर घंटा वाजवतो. लवकरच गावामध्ये ही अफवा पसरली व लोक गाव सोडून पळून जायला लागले.

त्या गावामध्ये एक आजीबाई राहायची तिला या गोष्टीवर विश्वास न्हवता. ती खूप धाडसी आणि शूर होती. तिने एक दिवस ठरवले की, मी या घंटेचा आवाजाचा मागोवा घेईल. व शोधून काढेल की, यामागचे नक्की कारण काय आहे.

एक दिवस आजीबाई गावातील संरपंचांना म्हणाली की, सरपंच मला विश्वास आहे की, गावात गणेशपूजा केल्यास हा आवाज नक्कीच बंद होईल. पण याकरिता काही पैशांची आवश्यकता आहे. सरपंचानी पूजेकरिता पैसे दिले.

चतुर आजीबाई ने फळे आणि मेवे विकत घेऊन गावातील मंदिरामध्ये पूजा केली. पूजा झाल्यानंतर आजीबाई सर्व साहित्य घेऊन जंगलच्या दिशेने गेली. तिने त्या जागी सर्व सामान नेऊन ठेवले जिथून रोज रात्री घंटेचा आवाज यायचा. व ती एका झुडपा मागे लपून बसली.

आता रात्री सर्व माकडे परतली आणि त्यांची दृष्टी तिथे ठेवलेल्या फळांवर पडली त्यांनी हातातील घंटा खाली ठेवली व फळे खाण्यास सुरवात केली. त्याचवेळी चतुर आजीबाईच्या ती घंटा उचलली आणि पळत गावाच्या दिशेने आली. व सर्व गावाला आणि सरपंचांना घडलेली कहाणी सांगितली. व ती घंटा दाखवली. गावातील लोकांनी आजीबाईच्या धाडसीपणाचे कौतुक केले व आभार मानले. कारण आजीबाईच्या तिच्या शूरपणामुळे सर्व गावकऱ्यांची भीती दूर केली.

तात्पर्य : कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवण्यापूर्वी आधी विचार करावा.

## जीवन का अमृत (भाग १)



### अनुभव की बात

वह (सतुगुरु) एक बिजली के बल्ब की तरह है, जिसके फ्यूज हो जाने पर उसकी जगह दूसरा लगा दिया जाता है। भौतिक शरीर तो नष्ट हो जाता है, पर क्राईस्ट-शक्ति संसार के अंत तक नहीं छोड़ती है।

उसकी दया हर समय कार्य करती रहती है: अतीत, वर्तमान और भविष्य में। इस प्रकार वह महान 'प्रभु' बिना रुके, एक जिंदा सतुगुरु के द्वारा, हर समय कार्य करता रहता है।

६३. कई तरीके हैं, जिनके द्वारा योगी लोग किसी भी जगह, इच्छानुसार, उड़कर पहुँच सकते हैं। संत इन तरीकों को नहीं अपनाते। वे शब्द देहधारी होते हैं।

६४. जहाँ तक गुरुओं और सतुगुरुओं का सवाल है, याद रखों कि हर वो चीज, जो एक जैसी प्रतीत हो, एक जैसी नहीं होती । गुरु तो बहुत और उनमें से, जो बहुचर्चित हैं या महान समझे जाते हैं, अधिकतर आत्म अनुभव की बात नहीं करते, हालाँकि वे इसके सैद्धांतिक पक्ष का, हजारों तरीकों से और मधुर से मधुर शब्दों में बखान कर सकते हैं। परखने का एक ही तरीका है कि भक्त खुद अंतर में चढ़ाई करे, खुद देखने वाला बने और वहाँ वह अतीत और वर्तमान के, सभी गुरुओं से मिल सकता हैं, वे कहीं भी हों, उच्च या निम्न मंडलों में। यदि कोई, जिसे निचले मंडलों का अनुभव हो, यह सोचे और प्रचार करे कि वह प्रभु एकमेक है और उन लोगों के बराबर है, जो परम लक्ष्य को पा चुके हैं और गुरु बन जाए, जबकि उसे खुद बहुत कुछ देखना और सीखना है, तो आप उसे कैसे स्वीकार करेंगे? सबसे बुरी बात यह है कि आम इंसान ऐसे तथाकथित प्रचारकों के ढोंग और दिखावे से आसानी से धोखे में आ जाते हैं, क्योंकि बाहर से ये लोग रूहानी विषयों की बातें करने में बहुत चतुर होते हैं, हालाँकि इनका ज्ञान उन्हें पुस्तकों से या सुनी सुनाई बातों द्वारा ही होता है यहाँ तक कि वे भक्ति भाव की भी काफी हद तक नकल कर लेते हैं।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### नाते म्हणजे दोन आत्म्यांतील संपर्क

विचार, शब्द आणि कर्म माझी स्वतः

निर्मिती होती. जर आज ती व्यक्ती तुमच्याशी नीट बोलली नाही तरी तुम्ही त्या व्यक्तीशी चांगलं बोलू शकता का ?

सुरेश ओबेरॉय हो, मी बोलू शकतो.

शिवानीदीदी याचा अर्थ, आपण आपली निर्मिती बदलण्याची निवड करू शकतो. ज्या क्षणी आपल्याला हे जाणवतं की आपले शब्द आणि आपली कृती ही आपली स्वतःची निर्मिती आहे त्या क्षणी ही शक्ती आपल्याकडे परत येते. उलटपक्षी, आपण असा विचार केला की आपले शब्द आणि कर्म म्हणजे लोकांच्या वागण्याला आपोआप दिली गेलेली प्रतिक्रिया आहे तर आपण सगळी शक्ती लोकांच्या हातात देतो. या सत्याची जाणीव जोवर आपल्याला होत नाही तोवर आपण आपल्या जुन्याच सवयी प्रबळ करत राहतो.

अशा प्रकारे, आपली कर्म ही आपली निर्मिती आहे, आपले शब्द ही आपली निर्मिती आहे. आपल्या विचारांचं काय?

सुरेश ओबेरॉय :

आपले विचार ही आपलीच निर्मिती आहे.

शिवानीदीदी : निश्चितच. हे सत्य आपण स्वीकारलं नाही तर आपण पुन्हा जुन्या भावभावनांनी पूर्णपणे झाकले जाऊ.

सुरेश ओबेरॉय :

जुन्या विचारांबरोबरच तेव्हाच्या भावनाही उफाळून भूतकाळातील सगळं पुन्हा जिवंत होतं.

शिवानीदीदी : आता आपण जाणीवपूर्वक विचार निर्माण करू शकतो: आता जेव्हा मी पुन्हा तो फोटो बघेन तेव्हा अनेक वर्षांपूर्वी जे घडलं ते कसंही असलं तरी माझ्या मनात येणारे विचार वेगळ्या प्रकारचे असतील... मला वारंवार त्याच भावनांकडे नेण्याची परवानगी मी त्या व्यक्तीला किंवा आठवणीला देणार नाही.

सुरेश ओबेरॉय : फोटोसारखी गोष्टही माझ्या मनात इतकी प्रबळ प्रतिक्रिया निर्माण करू शकते ह्या विचारानेच मला खुजं वाटतंय.

शिवानीदीदी हेच ते. आपण जेवढी जास्त प्रतिक्रिया देतो आतून तितकेच रिक्त होत जातो. आपल्यामध्ये विशिष्ट भावना निर्माण करण्यासाठी इतर कोणीच जबाबदार नसतं. आपणच आपल्या शब्दांच्या/कर्मांच्या प्रतिक्रियास्वरूप भाव निर्माण करतो पण इतरच आपल्या भावनांसाठी जबाबदार आहेत असा चुकीचा विचार करतो.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

पुणेकर एक पोपट पाळतात. पोपट रोज सकाळी-सकाळी मालकाला ऊठवतो.

पोपट : ऊठा मालक कामाला जायचय ना?

काही दिवसांनी पूणेकरांची बदली सोलापूरला होते.

पोपट : ऊठ कि बे झागिरदार... कामाला कोण तुझा बाप जाणार का?

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* अणुऊर्जेची सर्वाधिक निर्मिती करणारा देश कोणता?

– अमेरिका

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आहारवेद – आरोग्य संवर्धन

### कवठ

अंगावर पित्त उठले असल्यास कवठाच्या पानांचा रस अंगाला लावल्यास फायदा दिसून येतो.

लहान मुलांना कृत्रिमरीत्या बनवलेल्या जॅमऐवजी कवठाच्या गरात गूळ घालून मिक्सरमधून बारीक करून तयार झालेला जॅम पोळीला आतून लावून रोल करून खाण्यास द्यावे. यामुळे शरीरातील रक्ताचे व कॅल्शिअमचे प्रमाण योग्य राहण्यास मदत होते.

कवठाची पाने स्वच्छ धुऊन त्याची मेथीच्या भाजीसारखी भाजी बनवून ती खावी किंवा ही पाने पिठामध्ये मळून थालीपिठे बनवावी. कवठाच्या पानांमध्ये भरपूर पोषक घटक, फायबर व 'ब' जीवनसत्त्व असल्याने ती आरोग्यासाठी लाभदायक असतात.

कवठाची पाने ही सुवासिक व वातशामक असतात.

कवठ हे उत्तेजक असून अपचन, आमांश आणि अतिसार इत्यादी विकारांवर उपयुक्त आहे.

कवठ हे पिकलेलेच खावे. कच्चे कवठ खाल्ल्याने सर्दी, खोकला, डोकेदुखी होऊ शकते.)

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर

अहिल्यानगर

मोबाईल नं- ८७९३४००४००



एव्हरेस्ट अबॅकस अकॅडमीच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त महिला शिक्षिकांचा सन्मान करण्यात आला. अकॅडमीच्या विविध केंद्रांमधील महिला शिक्षिका या कार्यक्रमासाठी एकत्र आल्या होत्या.

# स्त्री ही केवळ कुटुंबाचा आधार नसून, ती समाज परिवर्तनाची शक्ती

**डॉ. कल्पना घडेकर यांचे प्रतिपादन, एव्हरेस्ट अॅबॅकस अॅकॅडमीच्यावतीने महिला शिक्षिकांचा गौरव**

नगर – महिलांनी आपल्या क्षमतेवर विश्वास ठेवत स्वतःचे हक्क धैर्याने मागितले पाहिजेत आणि त्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे, असे प्रमुख अतिथी डॉ. कल्पना घडेकर म्हणाल्या. महिलांनी समाजात पुढे येऊन नेतृत्वाची भूमिका स्वीकारणे ही काळाची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले. त्याचबरोबर भारतीय संस्कृती, परंपरा आणि सामाजिक मूल्यांचे जतन करण्याची जबाबदारीही महिलांनी तितक्याच ताकदीने पेलणे आवश्यक आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. समाजातील स्त्री ही केवळ कुटुंबाचा आधार नसून ती समाज परिवर्तनाची शक्ती आहे. शिक्षण, आत्मविश्वास आणि ध्येयवेड यामुळे महिलांना कोणतीही उंची गाठता येते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या प्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. कल्पना घडेकर यांनी महिलांना त्यांच्या अंतर्गत शक्तीची जाणीव करून दिली.

एव्हरेस्ट अबॅकस अकॅडमीच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त महिला शिक्षिकांचा सन्मान करण्यात आला. अकॅडमीच्या विविध केंद्रांमधील महिला शिक्षिका या कार्यक्रमासाठी एकत्र आल्या होत्या. महिलांच्या सक्षमीकरणाबरोबरच सामाजिक जाणीवा, परस्पर सहकार्य आणि सांस्कृतिक मूल्यांचा संदेश देणारा हा कार्यक्रम उत्साही वातावरणात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्योती मोरे या होत्या, तर एव्हरेस्ट अबॅकस अकॅडमीच्या मार्गदर्शक डॉ. कल्पना घडेकर या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या प्रारंभी अकॅडमीतील महिला शिक्षिकांचा पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला.

ज्योती मोरे म्हणाल्या की, महिला दिन हा केवळ उत्सव नसून महिलांच्या कर्तृत्वाची दखल घेण्याचा आणि त्यांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे. शिक्षणाच्या माध्यमातून महिलांनी समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्याची ताकद मिळवली आहे. एव्हरेस्ट अबॅकस अकॅडमीच्या माध्यमातून महिलांना प्रगतीची संधी देत त्यांना स्वावलंबी बनविण्याचा प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात काही यशस्वी शिक्षिकांनी आपल्या जीवनातील संघर्षमय प्रवासाबद्दल मनोगत व्यक्त केले. सुरुवातीच्या कठीण परिस्थितीतून मार्ग काढत शिक्षक म्हणून त्यांनी मिळवलेले यश, विद्यार्थ्यांच्या प्रगतीमुळे मिळणारा आनंद आणि आत्मविश्वास याबद्दल त्यांनी अनुभव कथन केले. त्यांच्या प्रेरणादायी अनुभवांमुळे उपस्थित महिलांना सकारात्मक ऊर्जा मिळाली.

या संवादातून महिलांनी एकमेकींना मैत्रिणीप्रमाणे साथ देण्याची भावना व्यक्त केली. परस्परांच्या अडचणी समजून घेत एकमेकींना आधार देण्याची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले. महिलांमध्ये ऐक्य, सहकार्य आणि आत्मविश्वास निर्माण करण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

दुपारच्या सत्रात विविध गुणदर्शन आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमांमध्ये महिलांनी स्वसंरक्षण, बालविवाह, स्त्री भ्रूणहत्या तसेच स्त्री–पुरुष समानता यांसारख्या महत्त्वपूर्ण सामाजिक विषयांवर प्रभावी सादरीकरण केले. या सादरीकरणांमधून समाजप्रबोधनाचा संदेश देण्यात आला आणि महिलांच्या सामाजिक जबाबदारीची जाणीव अधोरेखित करण्यात आली.

# प्रेरणादायी अक्षरधन

**थारोळे–विहिरीचे आणि रक्ताचे**




कोणतीही भाषा ही राजव्यवहार, लोकव्यवहार आणि शिक्षणव्यवहार या तीन माध्यमातून स्थित होते. लोकव्यवहारात तो तो भूप्रदेश तिथली लोकसंस्कृती, लोकजीवन, बोलीभाषा लोकव्यवहार याचा फार मोठा प्रभाव त्या–त्या भूप्रदेशातील भाषेवर पडत असतो. प्रत्येक दहा– दहा कोसावर भाषा बदलते असे म्हणतात, ते यामुळेच.

भाषा ही शब्दांच्या अंगाने वसत असते आणि संस्कृतीच्या अंगाने ठसत असते. या संस्कृतीमध्ये लोकसंस्कृतीचे एक वेगळे रूप उभे राहाते. लोकजीवन उभे करणारे समृद्ध ग्रामजीवन हा देखील मराठी भाषेच्या भक्कमतेचा पाया असू शकतो. मराठी भाषेतील अनेक शब्द हे ग्रामीण लोकजीवनाशी आणि लोकव्यवहार व त्यातील संकल्पनांशी जोडले गेले आहेत. लहानपणीची पाठ्यपुस्तकातील एक कविता अजूनही सहजपणे गुणगुणली जाते.

**मोट सुटली मोकळे बैल झाले।**
**गडी सारे एकत्र मिळूनि आले।**

मोट सुटते. मोटकऱ्यांबरोबर औतकरी, शेतकरीही विहिरीवरच्या दाट पिंपळाच्या झाडाखाली एकत्र भाकरी खातात आणि विसावतात. या मोटकऱ्याच्या चित्रामागे खूप संकल्पना उभ्या राहतात. मोट, नाडा, वडवण, कासरा, धाव, थारोळे असे कितीतरी शब्द आणि वस्तू डोळ्यासमोर तरळतात. शेतकरी मोट धरतो. पाण्यातली मोट पाणी भरून वर येते तेव्हा धावेवरून उलट्या दिशेने बैल खाली येतात. सारे पाणी थारोळ्यात पडते. थारोळं म्हणजे विहिरीच्या वडवानापाशी वरच्या बाजूला मोटेचे पाणी साठविण्यासाठी बांधलेला साधारणपणे एक ते दीड फुटी उंचीचा एक लहानसा हौद.

थारोळ्यातून पाणी उताराने पाटापाटाने वाहत संपूर्ण शिवारात पोचते आणि त्या पाण्याने शिवार फुलतो. आज थारोळं शब्द शहरी भागातील नव्हे तर ग्रामीण भागातील नव्या पिढीला माहीत नसावा कारण आज मोटाच राहिल्या नाहीत. नुकत्याच पुण्यातल्या एका मुलाला मी सहज विचारले, 'तुला थारोळे माहीत आहे का?'

त्यावर तो 'हो' म्हणाला. मी म्हणालो 'कसे असते ते?' त्यावर तो लगेच उद्गारला, 'काका ते रक्ताने माखलेले असते.' काय बोलणार यावर? त्या मुलाचे काहीच चुकलेले नव्हते. तो रोज वृत्तपत्रात बातमी वाचत असतो. त्यात लिहिलेले असते, 'अमूक अमूक ठिकाणी अपघात झाला आणि तो रक्ताच्या थारोळ्यात पडला.' त्याच्या दृष्टीने तेच थारोळे. आता या मुलाला थारोळ्याचा अर्थ कसा सांगायचा ?

काळ बदलला आणि ज्या थारोळ्याने विहिरीचे पाणी देऊन शिवाराला संजीवनी दिली तेच थारोळे आता रक्ताचे म्हणून रूढ व्हायला लागले. खरे थारोळे कसे समजणार? प्रत्येक शब्दामागे एक संस्कृती दडली आहे. ती संस्कृती समजावून घेतल्यावरच त्या शब्दाचा खरा अर्थ उमगू लागतो.

**– किशोर गांधी**



शास्त्रीय गायन परिक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांसह 'भक्तीसंध्या' संगीत विद्यालयाचे संस्थापक किशोर माळवदे.

# शास्त्रीय गायन परिक्षेत भक्तीसंध्या संगीत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे यश

नगर – अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ (मुंबई) यांच्यावतीने नोव्हेंबर २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या 'शास्त्रीय गायन परिक्षेत' भक्तीसंध्या संगीत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवले.

विद्यार्थ्यांना संगीत व अध्यात्माचे ज्ञान मिळावे यासाठी मार्गदर्शन करण्यात येते. शास्त्रीय गायन परिक्षेत प्रवेशिका पूर्ण गायनमध्ये कार्तिकी माळवदे हिने प्रथम श्रेणीत यश मिळवले. समृद्धी जाधव (प्रवेशिका पूर्ण) गायन, वैष्णवी साबळे (प्रवेशिका पूर्ण) गायन, वरुण ढोले (प्रवेशिका पूर्ण) गायन, अनंत जाधव (मध्यमा प्रथम) गायन, अत्री ढोले (प्रवेशिका प्रथम) गायन या सर्व विद्यार्थ्यांनी यश मिळवले. या सर्व विद्यार्थ्यांना 'भक्तीसंध्या' संगीत विद्यालयाचे संस्थापक किशोर माळवदे यांचे मार्गदर्शन लाभले.

बाल वयातच विद्यार्थ्यांना संगीताचे धडे दिले पहिजेत. त्यांना आवड निर्माण झाल्यास मोबाईल स्क्रीन पासून हे विद्यार्थी दूर राहतील. 'संगीत' ही कला भविष्यात जीवनाला वेगळे वळण देते, असे मत किशोर माळवदे यांनी व्यक्त करुन विद्यार्थ्यांचा गौरव केला.

# डॉ. विखे पाटील अभियांत्रिकीत स्टार्टअप टॉक सिरीजमध्ये उद्योजक एन.बी. धुमाळ यांचे व्याख्यान



डॉक्टर विखे पाटील अभियांत्रिकी स्टार्टअप टॉप सिरीज मध्ये उद्योजक एन.बी.धुमाळ यांचे व्याख्यान झाले. याप्रसंगी विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षकवृंद आदी. (छाया– विजय मते)

नगर – विळद घाट येथील डॉ.विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात स्टार्टअप टॉक सिरीजने उद्योजकीय उत्साह प्रज्वलित केला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व अभियांत्रिकी महाविद्यालयातील स्टार्टअप व इनोव्हेशन सेल यांच्या संयुक्त विद्यमाने अभियांत्रिकीच्या विद्यार्थी तसेच शिक्षक वर्गासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ स्टार्टअप टॉक सिरीज आयोजीत करण्यात आली होती.

या वेळी एन.बी. धुमाळ एक उद्योजक तसेच प्रेरणादायी वक्ते आणि यशस्वीतेचा सुवर्णमंत्र या बेस्टसेलर पुस्तकाचे लेखक यांनी यशस्वितेच्या व्यावहारीक रणनीती सांगितल्या. एन.बी.धुमाळ चॅरीटेबल फौंडेशनच्या अनुभवावरून त्यांनी उपस्थितांना युवा सशक्तीकरण आणि मनोवृत्ती परिवर्तनाच्या खऱ्या कथा सांगितल्या. अभियांत्रिकी केवळ नोक–यांबाबत नाही, ती समाजावर प्रभाव टाकणा–या उपाययोजना तयार करण्याबाबत आहे असे ते म्हणाले. नोकरी करणारे नाही तर नोकरी देणारे बना असे त्यांनी अनुभवातून विशद केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ.अजित लावरे हे उपस्थित होते. कार्यकमाचे सूत्रसंचालन प्रा.दत्तात्रय नन्नवरे यांनी केले.

संस्थेचे प्राचार्य डॉ. रविंद्र नवथर यांनी या सारख्या महत्वाच्या विषयावर व्याख्यानाचे आयोजन केल्याबद्दल विभागप्रमुखांचे कौतुक केले.

या उपक्रमासाठी डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशनचे डायरेक्टर टेक्निकल प्रा. सुनिल कल्हापुरे यांचे मार्गदर्शन लाभले.

कार्यक्रमासाठी डायरेक्टर जनरल डॉ.पी.एम. गायकवाड मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.सुजय विखे पाटील, नामदार डॉ.राधाकृष्ण विखे पाटील यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.





आर्किटेक्ट इंजिनिअर्स अॅण्ड सर्व्हेअर्स असोसिएशन (एसा), अहिल्यानगर यांच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त स्मार्ट सुगृहिणी स्पर्धा व होम मिनिस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. संस्थेतील महिला सभासद व त्यांच्या कुटुंबीयांसाठी विविध मनोरंजक व कौशल्याधारित स्पर्धा घेण्यात आल्या. (छाया – लहू दळवी)

# महिला दिनानिमित्त 'एसा'कडून आयोजित स्मार्ट सुगृहिणी स्पर्धेत चेतना मुथियान प्रथम

**होम मिनिस्टर स्पर्धांचा जल्लोष, खेळ पैठणीचा स्पर्धेने रंगली महिला दिनाची संध्याकाळ; प्रनोती हळगावकर विजेती**

नगर – आर्किटेक्ट इंजिनिअर्स अॅण्ड सर्व्हेअर्स असोसिएशन (एसा), अहिल्यानगर यांच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त स्मार्ट सुगृहिणी स्पर्धा व होम मिनिस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. संस्थेतील महिला सभासद व त्यांच्या कुटुंबीयांसाठी विविध मनोरंजक व कौशल्याधारित स्पर्धा घेण्यात आल्या.

या स्पर्धांमध्ये ठिपक्यांची रांगोळी, सामान्य ज्ञान, सलाड डेकोरेशन, घरगुती अडथळे शर्यत, नोटांची नवलाई आणि फिटनेस फेरी अशा विविध स्पर्धांचा समावेश होता. तसेच होम मिनिस्टर अंतर्गत सादरकर्ते चेतन गायकवाड यांनी 'खेळ पैठणीचा' ही स्पर्धा घेतली. या कार्यक्रमात ५० हून अधिक महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

रांगोळी स्पर्धेत गुंजन गुंदेचा यांनी प्रथम तर प्रिया कुलकर्णी यांनी द्वितीय क्रमांक मिळविला. सामान्य ज्ञान स्पर्धेत ऐश्वर्या देवी प्रथम आणि भारती मुथियान द्वितीय ठरल्या. सलाड सजावट स्पर्धेत रेणुका उजनीमठ प्रथम तर भाग्यश्री जहागीरदार द्वितीय आल्या. घरगुती अडथळे शर्यतीत रुपाली देवी प्रथम आणि वीणा सभारंजक द्वितीय ठरल्या. फिटनेस फेरीमध्ये अनुजा खांडेकर प्रथम तर भारती खांडेकर द्वितीय ठरल्या. नोटांची नवलाई स्पर्धेत मैथिली बेरड यांनी प्रथम तर चेतना मुथियान यांनी द्वितीय क्रमांक पटकावला.


स्मार्ट सुगृहिणी मुख्य स्पर्धेत चेतना आशिष मुथियान यांनी प्रथम क्रमांक मिळवत एरेक्शा एअर चिमणी हे बक्षीस मिळविले. गुंजन अमित गुंदेचा यांनी द्वितीय क्रमांक मिळवत एरेक्शा एअर फ्रायर तर मैथिली बेरड यांनी तृतीय क्रमांक मिळवत एरेक्शा इंडक्शन टॉप हे बक्षीस मिळविले. या स्पर्धेचे परीक्षण हर्षदा डोळसे (संचालक, अशोका आर्ट गॅलरी व अशोका आर्ट इन्स्टिट्यूट) यांनी केले.

यानंतर झालेल्या 'होम मिनिस्टर – खेळ पैठणीचा' या स्पर्धेत विविध मनोरंजक खेळ, मराठी गाण्यांवर नृत्य, उखाणे, भक्तीगीत व संगीत स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेत प्रनोती अनिकेत हळगावकर यांनी प्रथम क्रमांक पटकावत मानाची पैठणी जिंकली. मीना अनिल आठरे द्वितीय, मैथिली दादासाहेब बेरड तृतीय तर जयश्री जयप्रकाश विधाते चौथ्या क्रमांकावर राहिल्या. त्यांना अनुक्रमे गजांत लक्ष्मी, नेकलेस व सोन्याची नथ अशी बक्षिसे देण्यात आली. पूनम विशाल येसेकर व उपस्थितांच्या हस्ते विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली.

कार्यक्रमास अध्यक्ष अभिजीत देवी, उपाध्यक्ष प्रदीप तांदळे, सचिव भूषण पांडव, सुनिल औटी, संतोष खांडेकर, आदिनाथ दहिफळे, जितेश सचदेव, सचिन डागा, सुनिल जाधव, संकेत पादिर, अनमोल जैन, गौरव मांडगे, सभासद व त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

एसा लेडीज विंगच्या प्रमुख वैशाखी हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली विधी सचदेव, वर्षा कुसळकर, कोमल कुलकर्णी, निकिता बालटे आणि प्रणाली तांदळे यांनी या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले.

# प्रतिष्ठा एथनिक कापड शोरूमचे उद्घाटन



प्रतिष्ठा एथनिक या कापड शोरूमचे उद्घाटन महानगरपालिकेच्या महापौर सौ. ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते तसेच आयुर्वेदिक गुणे कॉलेजचे चेअरमन सचिन जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

नगर – शहराच्या व्यापारी वैभवात आणखी एक मानाचा तुरा जोडणारा सोहळा नुकताच सावेडी येथे पार पडला. प्रतिष्ठा एथनिक या कापड शोरूमचे उद्घाटन महानगरपालिकेच्या महापौर सौ. ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते तसेच अॅड. सचिन जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. या प्रसंगी शोरूमचे संचालक मोहन जोशी व त्यांचे जोशी परिवार, उपमहापौर धनंजय जाधव, नगरसेवक सुरेश बनसोडे, सागर मुर्तुडकर, अमोल गाडे, ऋग्वेद गंधे, जितू गंभीर, प्रविण गिते, सचिन तनपुरे, नितिन कदम आणि भागवत कुरधने तसेच उपस्थित होते.

या वेळी बोलताना संचालक मोहन जोशी यांनी आपल्या प्रवासाची आठवण सांगितली. त्यांनी सांगितले की, प्रोफेसर चौक येथे सुरू केलेले एक छोटेसे कपड्यांचे दुकान आज ग्राहकांच्या विश्वास आणि प्रेमामुळे वटवृक्षासारख्या भव्य शोरूममध्ये रुपांतरित झाले आहे. हा प्रवास मेहनत, चिकाटी आणि ग्राहकांच्या आशीर्वादामुळे शक्य झाला असल्याचे त्यांनी नमूद केले.

उद्घाटनप्रसंगी महापौर सौ. ज्योतीताई गाडे यांनी उपस्थितांशी संवाद साधत प्रतिष्ठा एथनिकच्या उपक्रमाचे कौतुक केले. त्या म्हणाल्या की, शहरातील ग्राहकांना दर्जेदार, आकर्षक आणि वैविध्यपूर्ण कापडांची उत्तम सेवा या शोरूममधून मिळेल. अशा नवीन व्यवसाय उपक्रमांमुळे शहराच्या आर्थिक विकासालाही चालना मिळते.

यावेळी सचिन जगताप यांनीही आपले मनोगत व्यक्त करत सांगितले की, शहरातील नागरिकांसाठी ही आनंदाची बाब आहे. अशा आधुनिक व दर्जेदार शोरूममुळे ग्राहकांना एकाच ठिकाणी सर्व पर्याय उपलब्ध होतात. या उपक्रमाला भविष्यात मोठे यश लाभो, अशी शुभेच्छा त्यांनी दिल्या.

प्रतिष्ठा एथनिक शोरूममध्ये उपलब्ध विशेष वस्त्रे येथे शेरवानी, कुर्ता–पायजमा, पगडी, पँट–शर्ट तसेच लग्न समारंभासाठी आवश्यक असलेले सर्व प्रकारचे मेन्स एथनिक व आधुनिक वस्त्रांचे आकर्षक आणि दर्जेदार कलेक्शन ग्राहकांसाठी ऑरम बिजनेस हब, नियर युनी स्टोअर, युपोलिस स्टोअर शेजारी, नगर–मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर या ठिकाणी उपलब्ध आहे.




सारडा महाविद्यालयात वैद्यकीय तपासणी शिबीरात मोफत सेवा देणाऱ्या डॉक्टरांचा सन्मान करून भेट वस्तू देण्यात आल्या.

# महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी महत्वाची

## डॉक्टर पारस कोठारी यांचे प्रतिपादन

नगर – सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कार्यक्रमांतर्गत पेमराज सारडा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. डॉ.काकासाहेब म्हस्के हॉस्पिटलच्या सहकार्याने व सारडा महाविद्यालयाचे चेअरमन डॉ.पारस कोठारी यांच्या प्रयत्नातून गेल्या २५ वर्षांपासून हा उपक्रम राबवला जात आहे. तीन दिवस चाललेल्या या शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांनी आरोग्य तपासणी करून उपचार केले. शिबिराच्या समारोप प्रसंगी उपक्रमात सहभगी झालेल्या डॉक्टरांचा भेट वस्तू सन्मान करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित, डॉ.काकासाहेब म्हस्के हॉस्पिटलच्या वैद्यकीय अधिकारी डॉ.अबोली कुलकर्णी, प्रबंधक अशोक असेरी, प्रा.योगेश तवर आदी उपस्थित होते.

डॉ.पारस कोठारी म्हणाले, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी सक्तीची केली आहे. ही आरोग्य तपासणी झाल्याशिवाय विद्यार्थी विद्यापीठाच्या परिक्षेस पात्र होत नाहीत. त्यामुळे सारडा महाविद्यालयात आरोग्य तपासणीचा उपक्रम दरवर्षी गांभीर्याने राबवला जातो. या तपासणीमध्ये विद्यार्थ्यांमध्ये आजारांचे निदान झाल्यास त्यांच्यावर वेळेत उपचार करता आले. या शिबिरासाठी डॉ. काकासाहेब म्हस्के हॉस्पिटल गेल्या २५ वर्षांपासून मोफत सहकार्य देत असल्याने मी म्हस्के हॉस्पिटलचे आभार मानतो.

# जागतिक महिला दिनानिमित्त बालक मंदिरमध्ये पाककला स्पर्धा



जागतिक महिला दिनानिमित्त दिल्लीगेट येथील बालक मंदिर महिला मंडळ शाळेमध्ये महापौर सौ. ज्योतीताई गाडे यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी मुख्याध्यापिका सौ. अस्मिता शूळ आदी.

नगर – जागतिक महिला दिनानिमित्त दिल्लीगेट येथील बालक मंदिर महिला मंडळ शाळेमध्ये पाककला स्पर्धा ८ मार्च महिला दिनाचे औचित्य साधून महिला मंडळ संस्थेतर्फे पाककला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेचा विषय मुलांसाठी पौष्टिक डबा हा होता. स्पर्धा बालक मंदिर महिला मंडळ शाळेत ११ मार्च रोजी घेण्यात आली. स्पर्धेला महिलांचा भरघोस प्रतिसाद मिळाला. यावेळी परीक्षक म्हणून सौ. सुरेखा मणियार व सौ. प्रतिमा श्रोत्री यांनी काम पाहिले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महिला मंडळ संस्थेच्या अध्यक्षा सौ. ज्योती केसकर होत्या. प्रमुख पाहुण्या म्हणून नवनिर्वाचित महापौर सौ. ज्योती गाडे व तसेच प्रा. डॉ. आश्लेषा भंडारकर, कलारंग अकॅडमीच्या सुजाता पायमोडे, प्राचार्य गीता गिल्डा, सौ. छाया राजपूत, प्रिया जानवे या कर्तबगार सत्कारमूर्ती उपस्थित होत्या.

महापौर सौ. ज्योतीताई गाडे व इतर प्रमुख अतिथींचा परिचय शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. अस्मिता शूळ आणि श्रीमती निरुपमा देशपांडे यांनी करून दिला. तसेच याप्रसंगी दासनवमी निमित्ताने घेण्यात आलेल्या सूर्यनमस्कार स्पर्धेतील विजयी संघातील विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र व बक्षीस देऊन गौरव करण्यात आला. तसेच विज्ञान प्रदर्शनातील यशस्वी विद्यार्थ्यांनाही बक्षिसे देण्यात आली.

युग करिअर तर्फे घेण्यात आलेला प्रज्ञाशोध परीक्षेत गुणवत्ता यादीत आलेले विद्यार्थी कुमारी प्रांजल गायकवाड (दहावी), ज्ञानदा शिंगारे (अकरावी), मिहीर घोटणकर (पंधरावा) यांचा सत्कार करण्यात आला. तसेच त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षिका सौ. मनीषा कुलकर्णी व सौ. प्रतिभा पवार आणि सर्वांना प्रेरणा देणाऱ्या मुख्याध्यापिका सौ. अस्मिता शूळ यांचा सन्मान केला गेला. यावेळी महिला मंडळ संस्थेतर्फे सौ. मुग्धा घोटणकर सौ. प्रतिभा शिनगारे आणि सौ. गायकवाड या माता पालकांचा सत्कार करण्यात आला. तसेच आदर्श माता पुरस्कार सौ. वैशाली चितांबर यांना देण्यात आला. सौ. आश्लेषा भांडारकर, सौ.छाया राजपूत, सौ.गीता गिल्डा, सौ.सुजाता औटी आणि महापौर सौ. ज्योतीताई गाडे यांचा सत्कार करण्यात आला.

महापौर सौ. ज्योतीताई गाडे यांनी महिलांना मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी पौष्टिक डबा हा विषय ठेवल्याबद्दल कौतुक केले तसेच रासायनिक खताच्या ऐवजी घरोघरी सेंद्रिय खताचा वापर करावा असे त्यांनी सांगितले.

त्याचबरोबर सौ. भांडारकर यांनी गांडूळ खताचे महत्त्व विशद करून स्वच्छते बद्दल माहिती दिली.

तसेच भाजप सचिव सौ. गीता गिल्डा यांनी महिला नवनिर्मिती शक्ती बद्दल सांगितले.

सूत्रसंचालन शिल्पा रसाळ यांनी केले. तसेच आभार प्रदर्शन सौ. धोपावकर यांनी केले. पाककला स्पर्धा कै. सौ. रंजना मुळे यांच्या स्मरणार्थ प्रदीप मुळे यांनी प्रायोजित केली होती. या स्पर्धेला चांगला प्रतिसाद लाभला. याप्रसंगी महिला मंडळ संस्थेच्या उपाध्यक्षा सौ. विद्या होळेहुन्नूर, सौ. मीनल गंधे, सौ गौरी मुळे, सौ. पद्मजा धोपावकर, सौ. रोहिणी पुंडलिक, पुष्पा चितांबर इत्यादी उपस्थित होत्या.

पाककला स्पर्धेत विजयी झालेल्या महिलांचा बक्षिसे देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी महिला मंडळ संस्थेच्या सर्व पदाधिकारी तसेच बालक मंदिर महिला मंडळ शाळेतील सर्व शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# आनंदऋषी हॉस्पिटलचे सेवाभावी उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी

**महावीर बडजाते यांचे प्रतिपादन**

नगर – श्री आनंदऋषीजी हॉस्पिटलने समाजासाठी राबविलेले उपक्रम अत्यंत कौतुकास्पद आहेत, असे प्रतिपादन उद्योजक महावीर बडजाते यांनी केले. आरोग्यसेवा ही समाजासाठी अत्यंत महत्त्वाची बाब असून, अशा शिबिरांमुळे अनेक गरजू रुग्णांना योग्य उपचार आणि मार्गदर्शन मिळते. समाजातील दुर्बल व गरजू घटकांसाठी या प्रकारच्या उपक्रमांची गरज आज अधिक जाणवत असल्याचेही ते म्हणाले.



श्री आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे रुग्णांच्या आरोग्यसेवेसाठी त्वचारोग तपासणी व मार्गदर्शन शिबिराचे उद्घाटन करताना महावीर फूड प्रोडक्ट्सचे संचालक उद्योजक महावीर बडजाते व अशोक चुडीवाल.

जैन सोशल फेडरेशनद्वारे संचालित श्री आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे रुग्णांच्या आरोग्यसेवेसाठी त्वचारोग तपासणी व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन महावीर फूड प्रोडक्ट्सचे संचालक उद्योजक महावीर बडजाते व अशोक चुडीवाल यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास समाजातील अनेक पाहुणे तसेच डॉक्टर व नागरिकांची उपस्थिती लाभली.

यावेळी कुणाल बडजाते, अजय गंगवाल, डॉ. विजया एरंडे, संतोष बोथरा, मानक कटारिया, सतीश लोढा, सुभाष मुनोत, वसंत चोपडा, डॉ. आशिष भंडारी आदी उपस्थित होते. प्रास्ताविक संतोष बोथरा यांनी तर सूत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी आभार सतीश लोढा यांनी मानले.

महावीर बडजाते पुढे म्हणाले, आनंदऋषी हॉस्पिटल हे अनेक रुग्णांसाठी हक्काचे आणि विश्वासाचे ठिकाण बनले आहे. येथे येणाऱ्या रुग्णांना कोणताही संकोच न बाळगता आपले आजार तपासून घेता येतात आणि योग्य उपचार मिळतात. त्यामुळे या रुग्णालयामुळे समाजातील अनेक गरजू रुग्णांना मोठा आधार मिळत असून, अशा सेवाभावी कार्यामुळे संस्थेचे कार्य अधिक बळकट होत आहे.

याप्रसंगी डॉ. विजया एरंडे यांनी त्वचारोगाविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. त्वचेचे विविध आजार वेळेवर ओळखणे आणि योग्य उपचार घेणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. बुरशीजन्य संसर्ग, अलर्जी, खाज, पिंपल्स, सोरायसिस, त्वचेवरील डाग, केस गळणे अशा विविध त्वचारोगांबाबत त्यांनी माहिती देत स्वच्छता, संतुलित आहार आणि योग्य जीवनशैली यांचे महत्त्वही त्यांनी स्पष्ट केले.

त्वचारोगाच्या लक्षणांकडे दुर्लक्ष न करता योग्य वेळी तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले. अशा प्रकारच्या तपासणी शिबिरांमुळे अनेक रुग्णांना प्रारंभीच रोगाचे निदान होऊन योग्य उपचार मिळतात, असेही त्यांनी नमूद केले. शिबिरात ४५ रुग्णांची तपासणी करण्यात आली.

# 'बिबिएनच्या उद्योजिका पुरस्कारां'चे १५ मार्चला कामाक्षी जोगळेकर यांच्या हस्ते होणार वितरण



नगर – ब्राह्मण बिझिनेस नेटवर्क वेलफेअर असोसिएशन आणि भगिनी निवेदिता सहकारी बँक लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून ब्राह्मण महिला उद्योजिका पुरस्कारांचे वितरण १५ मार्च रोजी पेमराज सारडा महाविद्यालयातील सभागृहात होणार आहे. देशपातळीवरील उद्योजिका व बरवा स्किन थेरपीच्या संस्थापिका कामाक्षी जोगळेकर–बर्वे यांच्या हस्ते या पुरस्कारांचे वितरण होणार आहे, अशी महिती संस्थेचे अध्यक्ष चिन्मय सुखटणकर यांनी दिली.

ब्राह्मण बिझिनेस नेटवर्क वेलफेअर असोसिएशन ही संस्था गेल्या १४ वर्षांपासून अनेक समाजाभिमुख उपक्रम राबवत आहेत. महिला उद्योजिका पुरस्कारासाठी सुमारे ७० प्रस्ताव संस्थेकडे प्राप्त झाले आहेत. नगर शहरासह विविध तालुक्यांतून प्रस्ताव प्राप्त झाले आहेत, असेही चिन्मय सुखटणकर यांनी सांगितले.

विश्वस्त धनश्री कुलकर्णी यांनी सांगितले की, या पुरस्कार वितरण सोहळ्यात सात पुरस्कार वितरित करण्यात येणार असून रोख ५००० रुपये आणि प्रमाणपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. पुरस्कार समितीच्या प्रमुख शिल्पा सोमणी यांनी सांगितले की, स्व.गीता गोडबोले घैसास यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा उद्योजिका पुरस्कार पाच महिला उद्योजिकांना, तर स्व.कुसुम बाळकृष्ण लोहगावकर उद्योजिका पुरस्कार खाद्य क्षेत्रात कार्यरत असलेल्या एका महिला उद्योजिकेला देण्यात येणार आहे. याशिवाय मंदा वसंत सोमणी नवउद्योजिका पुरस्कार नवोदित महिला व्यावसायिकेला देण्यात येणार आहे.

या कार्यक्रमास नगर शहरातील महिलांनी उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेच्या कार्यकारणी सदस्या वर्षा जोशी, आसावरी नातू, अपूर्वा काळे यांनी केले असून, अधिक माहितीसाठी ८०१०४९४९९६ या क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

# नगर येथील न्यू लॉ कॉलेजमध्ये १४ मार्च रोजी राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा

नगर – अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाच्या मार्गदर्शनाखाली येथील न्यू लॉ कॉलेज, अहिल्यानगर यांच्या वतीने १८ वर्षांपासून आयोजित करण्यात येणारी राज्यभरात कॉ. बापूसाहेब भापकर राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा १४ मार्च रोजी आयोजित करण्यात आली आहे. राज्यभरातील कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयांतील विद्यार्थी या स्पर्धेची उत्सुकतेने वाट पाहत असतात.

स्पर्धेच्या उद्घाटनासाठी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सचिव कॉ. सुभाष लांडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे सचिव ॲड. विश्वासराव आठरे पाटील असणार आहेत.

स्पर्धेचे बक्षीस वितरण त्याच दिवशी सायंकाळी ५.३० वाजता होणार असून संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे यांच्या हस्ते होईल. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर राहणार आहेत.वक्तृत्व स्पर्धा १४ मार्चला सकाळी ९.३० वाजता सुरू होणार असून स्पर्धेसाठी पुढील विषय निश्चित करण्यात आले आहेत – १) लोकशाहीचा आधारस्तंभ : समाजमाध्यमे, २) कृत्रिम बुद्धिमत्ता व मानवी भवितव्य, ३) कायदे समाजासाठी हवेत की समाज कायद्यांसाठी हवा : भारतीय समाजजीवनातील वास्तव, ४) आत्मनिर्भर भारत आणि महिला सक्षमीकरण, ५) राष्ट्रनिर्माणात युवकांची भूमिका.

वक्तृत्व स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या महाविद्यालयांनी दूरध्वनी क्र. (०२४१) २३२४०७४ किंवा स्पर्धेचे समन्वयक प्रा.डॉ. रामेश्वर दसुंगे (मो. ७२४९७४०५७५) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन प्राचार्य डॉ.एम.एम.तांबे यांनी केले आहे.

# महिलांनी स्वप्न पाहून ते साकार करण्यासाठी झेप घ्यावी

**संध्याताई गायकवाड यांचे प्रतिपादन, जनशिक्षण संस्थेत महिला दिनानिमित्त 'स्त्री शक्तीचा जागर', व्यावसायिक प्रशिक्षण देणाऱ्या प्रशिक्षिकांचा सन्मान**

नगर – महिलांमध्ये अपार क्षमता असून त्या कोणत्याही क्षेत्रात यश मिळवू शकतात. फक्त महिलांनी स्वतःवर विश्वास ठेवून संकल्पाने कार्य करणे गरजेचे आहे. प्रत्येक महिलेकडे काही ना काही विशेष गुण असतात. आवड असलेल्या क्षेत्रात मनापासून काम केल्यास यश निश्चित मिळते. महिलांनी मोठी स्वप्ने पाहून ती साकार करण्यासाठी धाडसाने पुढे झेप घ्यावी, असे आवाहन जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षणाधिकारी संध्याताई गायकवाड यांनी केले.



जनशिक्षण संस्थेत महिला दिनानिमित्त 'स्त्री शक्तीचा जागर' होवून व्यावसायिक प्रशिक्षण देणाऱ्या प्रशिक्षिकांचा सन्मान करण्यात आला.

भारत सरकारच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय संचलित जनशिक्षण संस्था येथे महिला दिनानिमित्त 'स्त्री शक्तीचा जागर' कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी संस्थेमार्फत जिल्हाभर महिलांना विविध व्यावसायिक प्रशिक्षण देणाऱ्या महिला प्रशिक्षिकांचा विशेष सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात संध्याताई गायकवाड बोलत होत्या. या प्रसंगी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहाय्यक आयुक्त रविकुमार पंतम, व्हाईस चेअरमन विजय इंगळे, चेअरपर्सन उषाताई गुंजाळ, व्यवस्थापकीय समिती सदस्य अनघा बंदिष्टी, विनोदा बेती, संस्थेचे प्रभारी संचालक शफाकत सय्यद, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी कुंदा शिंदे, लेखापाल अनिल तांदळे यांच्यासह प्रशिक्षिका, प्रशिक्षणार्थी युवती व महिला उपस्थित होत्या.

गायकवाड पुढे म्हणाल्या की, आज महिला प्रत्येक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. शिक्षण, उद्योग, प्रशासन, विज्ञान, क्रीडा अशा अनेक क्षेत्रांमध्ये महिलांनी आपल्या कर्तृत्वाची छाप उमटवली आहे. छोट्या व्यवसायापासून ते मोठ्या जबाबदाऱ्या पार पाडण्यापर्यंत महिलांची भूमिका महत्त्वाची आहे. महिलांनी एकमेकींचा सन्मान करणे ही समाज प्रगतीसाठी आवश्यक गोष्ट आहे. स्त्रीशक्तीची जाणीव ठेवून महिलांनी स्वतःला कमी लेखू नये, आत्मविश्वासाने पुढे जावे आणि आपल्या कुटुंबासह समाजाच्या विकासातही योगदान द्यावे, असेही त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात संस्थेचे प्रभारी संचालक शफाकत सय्यद यांनी जनशिक्षण संस्थेच्या कार्याचा आढावा घेतला. ते म्हणाले की, सन २००५ पासून संस्थेचे संस्थापक डॉ. राधेश्याम गुंजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली युवक–युवती व महिलांना विविध व्यावसायिक प्रशिक्षण दिले जात आहे. मागील २१ वर्षांत संस्थेने मोठा टप्पा गाठला असून हजारो युवक–युवती आणि महिलांना स्वावलंबी बनविण्याचे कार्य संस्थेने केले आहे. शून्यातून सुरुवात करून यशस्वी उद्योजक बनलेल्या अनेक महिलांच्या यशोगाथा समाजासमोर उभ्या राहिल्या आहेत, असे त्यांनी सांगितले.

प्रशिक्षण घेतलेल्या महिलांनीही आपले अनुभव व्यक्त करताना सांगितले की, जनशिक्षण संस्थेमुळे त्यांना आत्मनिर्भर होण्याची संधी मिळाली. विविध कौशल्य प्रशिक्षणामुळे व्यवसाय सुरू करण्याचे धैर्य मिळाले असून समाजात आत्मसन्मानाने उभे राहण्याचा आत्मविश्वासही वाढला आहे.

सहाय्यक आयुक्त रविकुमार पंतम म्हणाले की, भारत हा तरुणांचा देश आहे आणि महिलाही आज देशाच्या प्रगतीत मोठे योगदान देत आहेत. राष्ट्रपती पदापर्यंत महिला पोहोचल्या आहेत, ही देशासाठी अभिमानाची बाब आहे. महिलांनी ठाम संकल्प करून वाटचाल केली तर त्या नक्कीच यशाची शिखरे गाठू शकतात, असे त्यांनी नमूद केले.

व्हाईस चेअरमन विजय इंगळे यांनी सांगितले की, महिलांमध्ये अनेक कलागुण असतात. त्यांना योग्य दिशा व प्रोत्साहन मिळाले तर त्या समाजात मोठे बदल घडवू शकतात. सहनशीलता, धैर्य, कष्ट करण्याची वृत्ती आणि एकाग्रता हे गुण महिलांमध्ये नैसर्गिकरित्या असतात. या गुणांच्या बळावर महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून देशाच्या विकासात सक्रिय भूमिका बजावत आहेत, असेही त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमात प्रशिक्षणार्थी महिला व युवतींनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. नृत्य, गीत आणि लघुनाटिकांच्या माध्यमातून स्त्रीशक्तीचा संदेश देण्यात आला. उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात महिलांच्या कलागुणांना दाद दिली.

सूत्रसंचालन कुंदा शिंदे यांनी केले. अनिल तांदळे यांनी आभार मानले.



सावेडीतील श्रीराम मंदिर परिसरात नगरसेविका दिपालीताई बारस्कर यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

# महिला दिनानिमित्त सावेडीत वृक्षारोपण

नगर – जागतिक महिला दिनानिमित्त सावेडी येथील पंचवटी परिसरातील श्रीराम मंदिरात महिलांच्या सहभागातून वृक्षारोपणाचा उपक्रम पार पडला. महिलांच्या हस्ते जास्वंदाच्या रोपांची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. शिक्षिका साधना कुकडे यांच्या पुढाकाराने हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमात नगरसेविका दिपालीताई बारस्कर यांच्या हस्ते जास्वंदाच्या रोपांची लागवड करण्यात आली. उपस्थित महिलांनीही उत्साहाने वृक्षारोपण करून परिसर हिरवागार ठेवण्याचा संकल्प केला. पर्यावरण रक्षणासोबतच समाजात महिलांची भूमिका अधिक मजबूत करण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

या कार्यक्रमाला सौ. शिदोरे, मंजूषा कुलकर्णी, अलका वाघ, हिरा शहापुरे, मीना चौधरी, छाया मराठे, साळुंके, अडसूळ आदींसह अनेक महिला उपस्थित होत्या. यावेळी कवयित्री रूपचंद शिदोरे यांनी स्त्रीशक्तीवर आधारित प्रेरणादायी कविता सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीराम मंदिराचे पुजारी कुलकर्णी यांनी केले.

# अहिल्यानगरच्या स्क्रॅप व्यावसायिक कोमल साबळे यांचा राज्यस्तरीय 'यशस्वी उद्योजिका' म्हणून पुणे येथे गौरव

**महिला दिनानिमित्त सन्मान, उद्योगातून महिलांना दाखविला स्वावलंबनाचा मार्ग**

नगर – उद्योग क्षेत्रात महिलांनी पुढे येत समाजात स्वतःची वेगळी ओळख निर्माण करावी, याचे प्रेरणादायी उदाहरण अहिल्यानगर शहरातील कोमल नाना साबळे यांनी घालून दिले आहे. स्क्रॅपच्या व्यवसायात स्वतःची स्वतंत्र ब्रॅण्ड निर्माण करत त्यांनी अनेक महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत जागतिक महिला दिनानिमित्त दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्री (डिक्की) यांच्या वतीने त्यांचा पुणे येथे आयोजित राज्यस्तरीय कार्यक्रमात 'यशस्वी उद्योजिका' म्हणून सन्मान करण्यात आला. या सोहळ्यात डिक्कीचे संस्थापक–अध्यक्ष पद्मश्री डॉ. मिलिंद कांबळे, सोशल फॉर सोशल एन्टरप्रिन्युअरशीप मुंबईच्या चेअरपर्सन डॉ. अर्चना सिंग, डिक्की महिला आघाडीच्या राष्ट्रीय प्रमुख सीमाताई कांबळे, डिक्की पश्चिम भारताचे अध्यक्ष संतोष कांबळे, भारत सरकारच्या एससी–एसटी हबचे राज्य समन्वयक रितेशजी रंगारी, डिक्की महिला आघाडी राज्य प्रमुख निवेदिता कांबळे, राज्य उपप्रमुख गीता पेडणेकर, नगर जिल्हा डिक्कीचे प्रमुख चंद्रकांत काळोखे आदी उपस्थित होते.



कोमल नाना साबळे स्क्रॅपच्या व्यवसायात स्वतःची स्वतंत्र ब्रॅण्ड निर्माण करत त्यांनी अनेक महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत जागतिक महिला दिनानिमित्त दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्री (डिक्की) यांच्या वतीने त्यांचा पुणे येथे आयोजित राज्यस्तरीय कार्यक्रमात 'यशस्वी उद्योजिका' म्हणून सन्मान करताना डिक्कीचे संस्थापक–अध्यक्ष पद्मश्री डॉ. मिलिंद कांबळे आदी.

कोमल साबळे यांनी काही वर्षांपासून स्क्रॅप व्यवसायात सातत्याने मेहनत घेत स्वतःच्या फर्मची वेगळी ओळख निर्माण केली आहे. उद्योग उभारतानाच त्यांनी सामाजिक बांधिलकी जपत आपल्या व्यवसायातून सुमारे १५ कष्टकरी महिलांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे. त्यामुळे या महिलांना आर्थिक स्वावलंबनाचा आधार मिळाला आहे. विशेष म्हणजे कोविडच्या कठीण काळातही त्यांनी आपल्या कामगारांना साथ देत त्यांच्या कुटुंबांना आर्थिक मदत केली. तसेच शासकीय आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करून देत त्यांच्या कुटुंबांना मोठा दिलासा दिला. संकटकाळातही कामगारांच्या पाठीशी उभे राहण्याची त्यांची भूमिका लक्षात घेऊन डिक्कीच्या वतीने त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला.

या गौरवाबद्दल दलित उद्योग क्षेत्रातील उद्योजक, व्यावसायिक तसेच सामाजिक कार्यकर्त्यांकडून तसेच डिक्कीचे महाराष्ट्र प्रमुख अविनाश जगताप, पुणे विभाग प्रमुख ललित बनसोड, मार्गदर्शक गौतम भोसले यांनीही कोमल साबळे व त्यांचे पती, स्क्रॅप व्यापारी नाना साबळे यांचे अभिनंदन केले. यावेळी नगर जिल्ह्यातील महिला उद्योजिका मंदाकिनी काळोखे, शीतल वडागळे, वैशाली खरे तसेच उद्योजक नाना साबळे, राम वडागळे, सागर खरे, विजय क्षीरसागर आदी उपस्थित होते.

# सापडलेल्या 'त्या' बालकाच्या नातेवाईकांच्या शोधासाठी आवाहन

नगर – पाथर्डी तालुक्यातील पिंपळगाव कासार येथे सुमारे १ वर्ष ७ महिने वयाचा चि. रामेश्वर नावाचा बालक आढळून आला आहे. या बालकास सध्या स्नेहालय संचलित 'स्नेहांकुर दत्तक विधान केंद्र', केडगाव (अहिल्यानगर) येथे सुरक्षितपणे दाखल करण्यात आले आहे. या बालकाचे पालक अथवा नातेवाईक यांनी तातडीने संपर्क साधण्याचे आवाहन जिल्हा बाल संरक्षण अधिकारी प्रशांत गायकवाड यांनी केले आहे.

या बालकाच्या पालकांनी व नातेवाईकांनी ओळख पटवण्यासाठी जिल्हा बाल संरक्षण अधिकारी प्रशांत गायकवाड (भ्रमणध्वनी क्र. ९०२८२८२५४९) तसेच स्नेहांकुर दत्तक विधान केंद्राचे श्री. वारुळे (भ्रमणध्वनी क्र. ९०११०२६४८३) यांच्याशी संपर्क साधावा, असे प्रशासनातर्फे कळविण्यात आले आहे.

# रिक्षा व टॅक्सी नवीन परवान्यांच्या इरादापत्रांच्या वितरणाला स्थगिती

नगर – राज्यातील ऑटो रिक्षा व टॅक्सी यांच्या नवीन परवान्यांसंदर्भात देण्यात येणाऱ्या इरादापत्रांच्या खुल्या धोरणास ९ मार्च रोजी झालेल्या बैठकीत स्थगिती देण्यात आली आहे. त्यामुळे ऑटो रिक्षा किंवा टॅक्सीच्या नवीन परवान्यासाठी सध्यातरी कोणीही ऑनलाईन अर्ज करू नये.

संबंधित ऑटो रिक्षा व टॅक्सी संघटना, चालक–मालक तसेच नागरिकांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी सिद्धार्थ ठोके यांनी केले आहे.

# सर्व सोयीसुविधांनी परिपूर्ण शहर होण्यासाठी नागरिकांच्या सहकार्याची गरज

**महापौर ज्योती गाडे यांचे प्रतिपादन, क्रेडाई व विचार भारतीच्या वतीने बांधकाम महिलांच्या मोफत आरोग्य तपासणी शिबिर**

नगर – आपल्या शहराला आता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव प्राप्त झाले आहे. त्यांच्या नावास साजेसे असे शहर करण्याचा प्रयत्न महानगरपालिकेच्या माध्यमातून मी करत आहे. आपले नगर शहर स्वच्छ, सुंदर, हरित तसेच सर्व सोयीसुविधांनी परिपूर्ण होण्यासाठी मला सर्व नागरिकांच्या सहकार्याची गरज आहे. नागरिकांनी आपापला परिसर स्वच्छ ठेवावा तसेच झाडे लावून त्यांचे संगोपन करून आपला परिसर हरित करावा, असे आवाहन महापौर ज्योती गाडे यांनी करून अहिल्यानगर शहरामध्ये विचार भारती सातत्याने समाजाभिमुख उपक्रम राबवत आहे. सर्वसामान्य कष्टकरी महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचा उपक्रम कौतुकास्पद असून असे उपक्रम सातत्याने घ्यावेत, असे नमूद केले.



बांधकाम महिला कामगारांची मोफत आरोग्य तपासणी व मोफत औषधोपचार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी महापौर ज्योती गाडे, नगरसेविका पुष्पा बोरुडे, क्रेडाईच्या साक्षी मुथा, योगिता फिरोदिया, वंदना बांगर, विचार भारतीच्या मनीषा मुळे, वंदना गायकवाड, माया वाकळे, सुनंदा आदिक, सोनाली खांडरे आदी.

सावित्रीबाई फुले यांच्या स्मृति दिनानिमित्त शहरातील बांधकाम महिला कामगारांचे मोफत आरोग्य तपासणी व मोफत औषधोपचार शिबिर घेण्यात आले. नगरच्या बांधकाम क्षेत्रातील अग्रगण्य संस्था क्रेडाईच्या वुमन्स विंग व विचार भारतीच्या महिला विभागाच्या संयुक्त विद्यमाने व स्व.सुधा मुळे यांच्या स्मृती निमित्त सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. महापौर ज्योती गाडे यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन झाले. यावेळी नगरसेविका पुष्पा बोरुडे, क्रेडाईच्या साक्षी मुथा, योगिता फिरोदिया, वंदना बांगर, तसेच विचार भारतीच्या मनीषा मुळे, वंदना गायकवाड, माया वाकळे, महानगरपालिकेच्या नगररचनाच्या सहाय्यक संचालिका स्नेहल यादव, अनुलोम संस्थेच्या सुनंदा आदिक, जनकल्याण रक्तपेढीच्या सोनाली खांडरे, विखे मेडिकल कॉलेजच्या सृष्टी सारडा, इंडियन डेंटल असोसिएशनच्या डॉ.प्राजक्ता झावरे, डॉ. धनश्री मोरे व डॉ. मृदुला मुळे आदींसह सदस्या उपस्थित होत्या. या कार्यक्रमात १६७ महिलांची आरोग्य तपासनी व मोफत औषधोपचार करण्यात आले.

नगरसेविका पुष्पा बोरुडे म्हणाल्या, आपल्या पुढच्या पिढीला चांगल्या विचारांची प्रेरणा व शिकवण देण्यासाठी अशा समाजिक उपक्रमांची आज खूप आवश्यकता आहे. विचार भारती व क्रेडाई संस्थांनी राबवलेला हा उपक्रम कायम राबवा. सर्वसामान्य गरीब कुटुंबातील महिलांची आरोग्य तपासणी होणे आवश्यक आहे.

यावेळी डॉ. मनोहर देशपांडे, डॉ. नीलकंठ ठाकरे, डॉ.रेणुका जोशी, फर्मासिस्ट वर्षा भणगे आदी सहयोगी डॉक्टरांचा सन्मान करण्यात आला. यावेळी अनुलोम संस्थेच्या सुनंदा आदिक यांनी कष्टकरी महिलांकरता राज्य शासनाच्या योजनांची माहिती घेऊन त्याचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

प्रास्ताविकात साक्षी मुथा यांनी क्रेडाई वुमन्स विंगच्या विविध उपक्रमांची माहिती देऊन सर्वांचे स्वागत केले. मनीषा मुळे यांनी विचार भारतीच्या उपक्रमांची माहिती देऊन कष्टकरी महिलांचा आरोग्य तपासणीचा उपक्रम गेल्या १६ वर्षापासून सातत्याने राबवला जात असल्याचे सांगितले. सूत्रसंचालन ऐश्वर्या सागडे यांनी केली.

यावेळी क्रेडाईचे अध्यक्ष गिरीश अग्रवाल, अमित वाघमारे, उपाध्यक्ष प्रसाद आंधळे व सागर गांधी, सेक्रेटरी दीपक बांगर, खजिनदार विक्रम जोशी, अमित वाघमारे, विचार भारतीचे मार्गदर्शक राजाभाऊ मुळे, अशोक गायकवाड, बाबासाहेब वाकळे, करण कराळे, पुष्कर कुलकर्णी आदी उपस्थित होते.

# धम्माल मनोरंजन

## सुविचार



क्रोधाला औषध मौन.

## दिनविशेष १३ मार्च

१७३३: इंग्लिश रसायनशास्त्रज्ञ जोसेफ प्रिस्टले यांचा जन्म. (मृत्यू: ६ फेब्रुवारी १८०४)

१८९६: प्राच्यविद्या संशोधक महामहोपाध्याय डॉ. वासुदेव विष्णू मिराशी यांचा जन्म. (मृत्यू: ३ एप्रिल १९८५)

१९२६: ललित लेखक रवींद्र पिंगे यांचा जन्म. (मृत्यू: १७ ऑक्टोबर २००८)

१९३८: ४९वे योकोझुना जपानी सुमो तोचीनौमी तेरुयोशी यांचा जन्म.

१९२६: होंडुरास देशाचे अध्यक्ष, होंडुराचे वकील आणि राजकारणी – कार्लोस रॉबर्टो रीना (मृत्यू : १९ ऑगस्ट २००३)

१९१४: अमेरिकन नौदल वैमानिक, दुसऱ्या महायुद्धातील अमेरिकेचे पहिले फ्लाइंग ऐस – लेफ्टनंट एडवर्ड ओहेअर (मृत्यू : २६ नोव्हेंबर १९४३)

१८९३: महामहोपाध्याय, संस्कृत विद्वान, प्राच्यविद्यासंशोधक – डॉ. वासुदेव विष्णू मिराशी (मृत्यू : ३ एप्रिल १९८५)१३ मार्च मृत्यू

१८००: पेशवे दरबारातील एक मंत्री नानासाहेब फडणवीस यांचे निधन. (जन्म: १२ फेब्रुवारी १७४२ सातारा)

१८९९: दत्तात्रेय कोंडो घाटे उर्फ कवी दत्त यांचे निधन. (जन्म: २७ जून १८७५)

१९०१: अमेरिकेचे ३३वे राष्ट्राध्यक्ष बेंजामिन हॅरिसन यांचे निधन. (जन्म: २० ऑगस्ट १८३३)

१९५५: नेपाळचे राजे वीर विक्रम शाह त्रिभुवन यांचे निधन. (जन्म: २३ जून १९०६)

१९६७: वेस्ट इंडिजचे क्रिकेट खेळाडू सर फँक वॉरेल यांचे निधन. (जन्म: १ ऑगस्ट १९२४)

१९६९: गणितशास्त्रज्ञ रँग्लर मोहिनीराज लक्ष्मण चंद्रात्रेय यांचे निधन.

१९९४: मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे ज्येष्ठ नेते व सिटू या कामगार संघटनेचे लढवय्ये नेते श्रीपाद यशवंत कोल्हटकर यांचे निधन.

१९९६: अभिनेते आणि नाट्यनिर्माते शफी इनामदार यांचे निधन. (जन्म: २३ ऑक्टोबर १९४५)


१९९७: राष्ट्रीय महिला हॉकी खेळाडू शीला इराणी यांचे निधन.

२००४: सतारवादक उस्ताद विलायत खाँ यांचे निधन. (जन्म: २८ ऑगस्ट १९२८)

२००६: चिकन नुगेत चे निर्माते रॉबर्ट सी बेकर यांचे निधन. (जन्म: २९ डिसेंबर १९२१)

१९०६: अमेरिकन समाजसुधारक आणि महिला हक्क कार्यकर्त्या – सुसान बी. अँथनी (जन्म: १५ फेब्रुवारी १८२०)

## महाशब्दकोडे




### आडवे संकेत


१) सर्व साहित्य
५) स्वाभीमान बाळगणारा
९) घोगरा आवाज
१०) शुर, पराक्रमी
१२) मध्यान्हीची भयंकर उष्णता
१३) तोंड, मुख
१५) श्रेष्ठ, वरचढ
१६) हास्य, हसणे
१८) यज्ञ, पुजा
१९) फार जवळचा व्यक्ती
२२) टी.व्ही. सिरियल रामायणचे निर्माता
२४) फुटणारा
२६) कष्ट सोशीत फिरणे
२७) पाण्याचा मोठा प्रवाह
२८) रस्ता, मार्ग
२९) अपशकून
३०) अमावस्या
३१) पौष्टिक
३२) उधळी
३४) देवाचे अन्य रुपाने पृथ्वीवर येणे
३६) फार गहरा
३७) हिंदुंचे एक शुभ चिन्ह
३९) लिहिण्याचे साधन
४१) तरुणी
४३) श्रेष्ठ प्रतीचा ऋषी
४५) लहर, हुक्की
४६) दुर्घटना
४७) त्रास, कंटाळा
४८) बेचव ५१) कपर्दिका
५३) सैन्याची तुकडी
५४) कृषीवल ५५) फार मजबूत

### उभे संकेत

१) एक वाङ्निश्चय
२) नदीवरील बांध
३) गहाण ठेवलेली वस्तू सावकाराच्या ताब्यात नसून कर्ज घेणाराचे जवळ असते अशा गहाणाचा प्रकार.
४) एक ऋतू
५) आर्य समाजाची स्थापना यांनी केली.
६) सन्मान
७) बेचव, कंटाळवाणे
८) चविष्ट, गोड
११) चटणी वाटण्याचे साधन
१४) रोख १७) मद्य, दारु
२०) क्षणिक तुफान२१) कुर्रेबाज
२३) हाच खरा धर्म आहे
२४) स्पष्टवक्ता २५) कर्म, कृती
२८) सुगंध २९) प्रसिद्ध
३०) ऐनवेळी धोका देणारा
३३) हवा देणारा पंखा
३५) गेले तुप गेले
३८) अशक्त, रोड
४०) एक रक्तपिपासू
४२) प्रमाणे, सारखा
४४) नेहमी शौचास जाणे
४६) भाजीला शिजविताना लावण्याचे पीठ
४९) पुट
५०) गरीब
५२) गोंद करण्याचा पदार्थ

### मागील उत्तर






१) आझाद हिंद सेनेच्या राणी रेजीमेंट या तुकडीचे नेतृत्त्व कोणाकडे होते?
अ)मादाम भिकाजी कामा ब) सरोजीनी नायडू
क)राणी लक्ष्मीबाई ड) डॉ. लक्ष्मीस्वामी नाथन

२) पाणी पंचायत या संकल्पनेचे जनक म्हणून कोणास ओळखले जाते?
अ)विलासराव साळुंके ब)विलासराव नाईक
क)विलासराव देशमुख ड)मेधा पाटकर

३) पुण्यात सार्वजनिक सभेची स्थापना खालीलपैकी कोणी केली?
अ)ग.वा. जोशी ब)आगरकर क)शिवाजी देशमुख ड)न्या. रानडे

४) तुषार सिंचन पद्धती खालीलपैकी कोणत्या पिकासाठी वापरता येत नाही? अ)कडधान्य ब)फळझाडे
क)तृणधान्य ड)भात व ज्युट

५) डिस्कव्हरी यानाची शंभरवी मोहिम कधी पार पडली?
अ)२५ ऑग. २००० ब)१३ ऑक्टो. २०००
क)१ जाने.२००१ ड)६ नोव्हें. २००१

६) WTO चे मुख्यालय कोठे आहे?
अ)टोकियो ब)जिनीव्हा क)पॅरिस ड)दिल्ली

७) न्या. कुर्डूकर आयोग कोणत्या घटनेशी संबंधित आहे ?
अ)एन्टोन प्रकल्प फेरविचार ब) विधीमंडळ आरक्षण
क)कृष्णापानी वाटप ड) नर्मदा बचाव

८) स्टार्च कशाचे मिश्रण आहे?
अ)कार्बोहायड्रेटस् ब)लिपीडसक)ॲमीनो ॲसिड्स ड)ऑरगनीक ॲसिड

९) घटनापरिषदेमध्ये सादर उद्देश पत्रीकेमधील विचारांना भारतीय घटनेच्या कोणत्या भागात पूर्णपणे सामील केल्या गेले आहे?
अ)घटनेची मार्गदर्शक तत्त्वे ब)प्रस्तावना
क)मुलभूत कर्तव्ये ड) मुलभूत हक्क

१०) जी.पी.एस.चा अर्थ काय आहे?
अ)ग्लोबल पोझिशनींग सिस्टीम ब)गॅलिलिओ फिजीशीओ सिस्टीम
क)ग्लोबल पेटंट सर्व्हीसेस ड)जेनेटीक प्रिपरेशन सर्व्हीसेस

११) शेणखतामध्ये किती टक्के नत्र असते?
अ)०.५ टक्के ब)३ टक्के क)२.६ टक्के ड)१ टक्का

१२) सन १९०९-१० च्या अंदाजपत्रकाप्रमाणे महिलांसाठी कर सुट उत्पनाची मर्यादा खालीलपैकी किती आहे?
अ)४ लाख ब)१.९ लाख क)३ लाख ड)१ लाख २० हजार

१३) विषाणु जेव्हा पोशिंद्याच्या बाहेर असतो तेव्हा .......?
अ)विभाजन पावत नाही ब)त्याचा आकार वाढतो
क)तसाच राहतो ड) विभाजन पावतो

१४) खालीलपैकी कोणत्या योजनेपासून केंद्राची योजना व राज्याची योजना असे योजनांचे स्वतंत्र वर्गीकरण करण्यात आले?
अ)चवथ्या ब)पाचव्या क)सातव्या ड)नवव्या

१५) ऑक्टोबर १९३६ मध्ये स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना कोणी केली?
अ)डॉ. आंबेडकर ब)शिवाजीराव देशमुख क)म. फुले ड) शाहु महाराज

१६)खालीलपैकी कोणी गुप्तपणे स्वदेशी, पंचायत राज, स्वदेश न्यायव्यवस्था इत्यादी साधनांनी इंग्रजांविरुद्ध पंजाबमध्ये गुप्तपणे प्रतिसरकारची स्थापना केली?
अ)प्रमोद सिंग ब)गुरुरामसिंग कुका क)अमरसिंग ड)सरदारसिंग राणा

१७) चटई क्षेत्र निर्देशांक कशाशी संबंधित आहे?
अ)जागेचा वापर ब)बिल्डर्स क)कुटीर उद्योग ड)किंमत वाढ

१८)केंद्र शासनाने नेमलेल्या सहाव्या वेतन आयोगाचे अध्यक्ष कोण होते?
अ)न्या. राजेंद्रबाबू ब)सुरेश तेंडुलकर
क)न्या. बी.एन. श्रीकृष्ण ड)चंद्रशेखर भावे

१९) पी.व्ही.सी. प्लॅस्टीक कोणत्या प्रकारच्या पद्धतीने तयार करतात?
अ)पॉलिमरायझेशन ब)कोकिंग क)रिडक्शन ड)डिस्टीलेशन

२०) खालीलपैकी कोणी पंचशिलतत्त्वाचा पुरस्कार भारताच्या परराष्ट्रीय धोरणात केला?
अ)पं. नेहरु ब)डॉ. राजेंद्र प्रसाद क)म. गांधी ड)सरदार पटेल

२१) जकाती आणि व्यापारावरील सर्वसाधारण करार कोणत्यासाली करण्यात आला?अ)१९५२ब)१९४८ क)१९४६ ड)१९४१

२२) दिनमित्रकार म्हणून खालीलपैकी कोणाला ओळखले जाते?
अ)मुकूंदराव पाटील ब)भाष्करराव जाधव
क)विठ्ठल रामजी शिंदे ड)दास राम

२३) भारतातील मोठ्या बँकांचे राष्ट्रीयकरण करण्यामागे मुख्य उद्देश कशाचा विकास करण्याचा होता?
अ)ग्रामीण ब)शहरी क)राज्यांचा ड)केंद्र सरकारचा

२४) बॅ.शामजी कृष्ण वर्मा यांनी खालीलपैकी कोठे इंडिया हाऊसची स्थापना केली? अ)लंडन ब)न्यूयॉर्क क)पॅरिस ड)दिल्ली


२५) ट्रॉम्बे कशासाठी प्रसिद्ध आहे?
अ)सौर विद्युत केंद्र ब)अणुविद्युत केंद्र
क)औष्णिक विद्युत केंद्र ड)जलविद्युत केंद्र


२६)नत्रयुक्त खते तयार करण्यासाठीखालीलपैकी कोणता कच्चा माल वापरतात?
अ)पेट्रोल ब)नॅफ्था क)युरिया ड)कोलगॅस

२७) सन २००२ ते ०३ मध्ये सर्व राज्ये व केंद्र शासीत प्रदेशात खालीलपैकी कोणती योजना सुरु करण्यात आली होती?
अ)पंतप्रधान ग्राम सडक योजना ब)समग्र आवास योजना
क)भारत निर्माण योजना ड)प्रधाममंत्री ग्रामोदय योजना

उत्तरः (१-ड), (२-अ), (३-अ), (४-ड), (५-ब), (६-ब), (७-अ), (८-अ), (९-ब), (१०-अ), (११-अ), (१२-ब), (१३-अ), (१४- अ), (१५-अ), (१६-ब), (१७-अ), (१८-क), (१९-अ), (२०-अ), (२१-ब), (२२-अ), (२३-ब), (२४-अ), (२५-क),(२६-ब), (२७-ब).

## फिल्मी शब्दकोड






### आडवे संकेत

१) सन् १९९८ में बनी दुश्मन इस फिल्म की नायीका. ३) काश आप हमारे होते इस फिल्म का नायक.
६) सन् १९९९ में गोविंद निहलानी निर्देशित इस फिल्म में अजय देवगन और तब्बू थे.
८) अच्छा तो हम चलते है फिर कब मिलोगे जब तुम कहोगे.... यह गाना राजेश खन्ना अभिनीत इस फिल्म का है. ९) एक मसाफिर XX हसीना (फिल्म)
१०) इस फिल्म में अनिल कपूर का डबल रोल था.
१४) सन् १९९९ में निर्देशक लतीफ बिन्नी के इस फिल्म में अक्षय खन्ना और सोनाली बेंद्रे थे.
१६) ये तेरी आंखे झुकी झुकी ये तेरा चेहरा खिला खिला.... यह गाना मिलींद गुणाजी अभिनीत इस फिल्म का है. १८) इस नामसे दो फिल्में बनी पहली में गुरुदत्त और दुसरी में मिथून चक्रवर्ती थे.
१९) इस फिल्म में जितेंद्र का डबल रोल था. २०) शत्रूघ्न सिन्हा और श्रीदेवी की एक फिल्म.
२१) XX सुहागन (फिल्म)
२४) सन् २००० में निर्माता निर्देशक सुनील दर्शन के इस फिल्म में अक्षय कुमार और करिश्मा कपूर थे.
२५) म. XX (गायक) २७) XX पत्थर (फिल्म)
२८) अग्नीपथ इस फिल्म में अमिताभ बच्चन की नायीका.
३०) सन् १९९३ में कल्पना लाजमी निर्देशित इस फिल्म में राज बब्बर और डिम्पल कपाडिया थे. ३१) सन् २००१ में रहना है तेरे दिल में इस फिल्म का नायक.
३२) उदीत XXX (फिल्म)
३३) हृत्विक रोशन, करिना कपूर की एक फिल्म.

### उभे संकेत

१) राकेश रोशन और जयाप्रदा की एक हिट फिल्म.
२) एक मशहूर गायीका.
४) सन् १९८६ में बनी कर्मा इस फिल्म में दिलीप कुमार की पत्नी.
५) जितेंद्र, जयाप्रदा, राजेश खन्ना, श्रीदेवी, अमजद खान, कादर खान और रणजीत अभिनीत फिल्म.
६) सन् १९७९ में दिपक बाहरी निर्देशित इस फिल्म में मिथून चक्रवर्ती और रंजीता थे.
७) XXXX चूप रहुंगी (फिल्म)
११) सन् १९८८ में बनी खुन भरी मांग इस फिल्म का खलनायक.
१२) इस नाम से दो फिल्म बनी. पहिली में मनोज कुमार और दुसरी में कमल हसन थे.
१३) सन् १९९९ में बनी ये है मुंबई मेरी जान इस फिल्म का नायक.
१५) मिथून चक्रवर्ती, अमृता सिंह, दिना पाठक, शम्मी कपूर और शक्ती कपूर अभिनीत फिल्म.
१७) सन् १९९९ में शकील नुरानी निर्देशित इस फिल्म में सुनील शेट्टी और प्रिया गील थे.
१८) सन् १९९२ में बनी दौलत की जंग इस फिल्म का नायक.
२२) XXXX कोहली (नायक)
२३) XX ईनामदार (सहनायक)
२५) सन् २००३ में बनी सत्ता इस फिल्म की नायीका.
२६) XX का गुलाम (फिल्म)
२७) सन् १९८१ में टिनू आनंद के निर्देशन में बनी इस फिल्म में अमिताभ बच्चन और परवीन बॉबी थे.
२९) XX संतोषी मां (फिल्म)

### मागील फिल्मी उत्तर



## चारोळी

मला हवं असतं
तुझ छान हसणं
हळूच बाजूला सार
नेहमीचंच रुसणं

## पाक कला

### अंड्याचा पराठा

साहित्य- १)२-३ अंडी, बारीक चिरलेला कांदा-दोन टी स्पून, थोडी बारीक चिरलेली कोथिंबीर, मीठ, मिर-पूड. २) कणीक-सव्वा ते दीड कप, बसेन-अर्धा मीठ, तेल.

कृती- एक मधील सर्व साहित्य घाला. अंडी अधी उघडून घेऊन व कुस्करून मग त्यात उरलेले साहित्य घाला. उकडलेली अंडी किसली तर अधिक चांगले. दोन मधील साहित्य (तेल वगळून) एकत्र करा व चांगले मळून मळलेल्या कणकेचे मध्यम उंडे करून घ्या. प्रत्येक उंड्यात अंड्याचे थोडे थोडे सारण भरा. पुरणपोळीप्रमाणे प्रत्येक उंडा हातावर गोलसर मळून घ्या. अलगद लाटा. फ्राय पॅनवर, सर्व बाजूंनी तेल सोडून चांगला खरपूस भाजा.

# मानकन्हैय्या ट्रस्टव्दारे माता भगिनींचा सन्मान हा स्तुत्य उपक्रम

## सौ. धनश्री विखे पाटील यांचे प्रतिपादन

नगर – सदर उपक्रम अत्यंत स्तुत्य असुन त्याचे अनुकरण सर्वांनी आपापल्या गावात/क्षेत्रात करावे, असे प्रतिपादन सौ. धनश्री विखे यांनी केले. त्या पुढे म्हणाल्या मला या पुरस्कारामुळे आणखीन जोमाने कार्य करण्याची प्रेरणा मिळाली. महिलेचा झालेला सन्मान हा संपुर्ण कुटुंबाला आनंदित करतो. खर तर स्त्री हीच कुटुंबाची पालनहार असते. सक्षम स्त्री देशाला उन्नतीकडे घेऊन जाते. आज मातांचाही आदर्श माता गौरव पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला. याच माता मुलांना घडवत असतात.



मानकन्हैय्या ट्रस्टच्या वतीने आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधुन विविध पुरस्कारांचे वितरण सोहळा साई सूर्य नेत्रसेवाच्या दालनात झाला. नारीशक्ती पुरस्कारांचे वितरण डॉ. सुधा कांकरिया यांच्या हस्ते तर आदर्शमाता गौरव पुरस्काराचे वितरण सौ. धनश्री विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

मानकन्हैय्या ट्रस्टच्या वतीने आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधुन विविध पुरस्कारांचे वितरण सोहळा साई सूर्य नेत्रसेवाच्या दालनात झाला. नारीशक्ती पुरस्कारांचे वितरण डॉ. सुधा कांकरिया यांच्या हस्ते तर आदर्शमाता गौरव पुरस्काराचे वितरण सौ. धनश्री विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. समवेत सौ. सुप्रिया धनंजय जाधव उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महापौर सौ. ज्योती अमोल गाडे या होत्या. सुरूवातीस दीपप्रज्वलन करून खास महिलांसाठी असलेल्या नेत्रआरोग्य शिबीराचे तसेच पुरस्कार वितरण समारंभाचे उद्घाटन करण्यात आले. मानपत्र, स्मृतीचिन्ह, मुकुट, मोतीहार, शाल आणि डॉ. सुधा कांकरिया लिखित पुस्तक स्त्रीजन्माचे स्वागत करा असे पुरस्काराचे स्वरूप होते. वीर माता सौ. लताबाई आजीनाथ मेहेत्रे, सौ. प्रभावती तुकाराम केदार, श्रीमती कौशल्याबाई कोंडीराम ढाकणे, बी के शर्मिला बाळासाहेब शिंदे, सौ. महानंदा अनिल लांडगे यांचा आदर्श माता गौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

महापौर सौ. ज्योती गाडे म्हणाल्या की, मी लहानपणापासुन डॉ. सुधाताईंचे कार्य पहात आहे. त्यांच्या वतीने आज मला नारी शक्ती पुरस्कार प्राप्त झाला याबद्दल मला खुप समाधान वाटत आहे. महापौर म्हणून मी अहिल्यानगर शहर 'इंदौर' च्या धरतीवर स्वच्छ व सुंदर करण्याचा निश्चय केला आहे. हे कार्य मी आता अधिक ताकतीने करेन.

पुरस्कार स्विकारतांना सर्व आदर्श मातांच्या डोळयामध्ये स्नेहभाव व कृतज्ञता झळकुन गेली. सर्वांनी मिळालेल्या पुरस्काराबद्दल आदर व्यक्त करत आभार मानले. हे पुरस्कार म्हणजे आमच्यासाठी आनंदाचा ठेवा व भविष्यासाठी प्रेरणा आहे असे त्या म्हणाल्या. सौ. सुप्रिया जाधव यांनी सर्वांचे अभिनंदन केले.

सुरूवातीस डॉ. सुधा कांकरिया यांनी स्वागत व प्रास्ताविक केले व पुरस्कारामागील उद्देश स्पष्ट केला. त्या म्हणाल्या की आमच्या मातोश्री श्रीमती मानकुवरबाई कांकरिया स्वातंत्र्यसैनिका होत्या. त्यांनी देशाला स्वातंत्र्य मिळावे म्हणूनच्या लढयात ९ महिने कारावास भोगला. या मातेच्या स्मृतीस वंदन करण्यासाठी तसेच स्त्री शक्तीला अभिवादन करण्यासाठी या पुरस्काराचे आयोजन केले आहे.

सदर पुरस्काराचे यंदाचे हे २१ वे वर्ष आहे. खास महिलांसाठी आयोजित केलेल्या मोफत नेत्र आरोग्य शिबीराचा २४० माता भगिनींनी लाभ घेतला. डॉ.प्रकाश कांकरिया यांनी आभार मानले. सूत्रसंचलन रामदास केदार आणि सौ. अर्चना चौधरी यांनी केले

# 'ऑईल स्ट्राईक' मुळे शेअर बाजार कोसळला

## गुंतवणूकदारांनी अवघ्या पाच सेकंदात ५ लाख कोटी गमावले

मुंबई – मध्यपूर्वेतील तणाव आणि युद्धाच्या वाढत्या धोक्यामुळे १२ मार्च रोजी सकाळी भारतीय शेअर बाजार हादरला आहे. मध्यपूर्वेतील युद्धादरम्यान तेल आणि वायूच्या वाढत्या संकटामुळे जगभरातील बाजाराला कापरे भरले असून क्रूडचा दणका भारतीय बाजारावरही मोठा परिणाम झाला आणि सेन्सेक्स व निफ्टी निर्देशांक उघडताच कोसळले. गुंतवणूकदारांनी अवघ्या पाच सेकंदात ५ लाख कोटी गमावले.

पश्चिम आशियातील युद्धाच्या आगीत पुन्हा एकदा भारतीय शेअर बाजार होरपळला आहे. गुरुवारी उघडताच सेन्सेक्स आणि निफ्टी दोन्ही निर्देशांक कोसळले.अमेरिका–इस्रायलशी झालेल्या इराण युद्धामुळे निर्माण झालेल्या तेल संकट आणि भारतातील एलपीजी संकटाचा थेट परिणाम देशांतर्गत बाजारावर झाला.

मध्यपूर्वेतील युद्धादरम्यान ऑईल स्ट्राईक मुळे शेअर बाजार देखील दबावाखाली आहे आणि त्यात सुधारणा होण्याची चिन्हे दिसत नाहीत. पश्चिम आशियातील वाढत्या तणावाचा थेट परिणाम शेअर मार्केटसोबतच गुंतवणूकदारांच्या खिशावर होताना दिसत आहे. १२ मार्च रोजी सकाळी बाजारातील व्यवहार सुरू होताच अवघ्या काही गुंतवणूकदारांनी सेकंदात सुमारे ५ लाख कोटी गमावले. देशांतर्गत बाजारातील विक्रीच्या गर्दीत सेन्सेक्स आणि निफ्टीसारखे प्रमुख निर्देशांक पत्त्याच्या बंगल्यासारखे कोसळले ज्यामुळे बाजारात व्यापक घबराट पसरली.

मुंबई शेअर बाजार (सेन्सेक्स) उघडताच ९७८ अंक आपटला तर, एनएसई निफ्टी २७५ अंक खाली आला. या दरम्यान झोमॅटो, इंडिगो आणि आयसीआयसीआय बँक यासह अनेक प्रमुख शेअर्समध्ये घसरण झाली असून १२ मार्च रोजी कच्च्या तेलाच्या किमती अचानक ९ टक्क्यांनी वाढल्या. अमेरिका–इस्रायल आणि इराणमधील वाढता तणाव आणि कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींमुळे गुंतवणूकदारांच्या भावनांवर गंभीर परिणाम होताना दिसत असून याआधी बुधवारी सेन्सेक्समध्ये १,३०० पेक्षा जास्त अंकांची घसरण झाली होती.

# शिक्षणामुळेच स्त्री सशक्त होते : अरुणाताई पारधे

नगर – स्त्री शिक्षण हा केवळ अधिकार नसून समाजाच्या प्रगतीसाठी अत्यंत आवश्यक घटक आहे. त्यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि महात्मा ज्योतीराव फुले यांच्या कार्याचा उल्लेख करत स्त्रियांसाठी शिक्षणाचा मार्ग खुला करण्यासाठी त्यांनी केलेल्या संघर्षाची आठवण करून दिली. स्त्री शिक्षणामुळे महिलांमध्ये आत्मविश्वास वाढतो, समानतेची जाणीव निर्माण होते आणि समाजात सन्मानाने जगण्याची ताकद मिळते. त्यामुळे प्रत्येक मुलीला शिक्षणाची संधी मिळणे आवश्यक असल्याचे अरुणाताई पारधे यांनी सांगितले. अध्यक्षीय भाषणात अरुणाताई पारधे यांनी महिलांच्या जीवनात शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले.

## महिला सशक्तीकरणाचा संदेश देत जागतिक दिन साजरा, आयडियल हेल्पिंग हॅण्ड फाउंडेशनचा उपक्रम



आयडियल हेल्पिंग हॅण्ड फाउंडेशन या संस्थेमार्फत जागतिक महिला दिनानिमित्त महिला सशक्तीकरणाचा संदेश देणारा कार्यक्रम पार पडला.

आयडियल हेल्पिंग हॅण्ड फाउंडेशन या संस्थेमार्फत जागतिक महिला दिनानिमित्त महिला सशक्तीकरणाचा संदेश देणारा कार्यक्रम पार पडला. समाजातील महिलांना प्रोत्साहन देणे, स्वावलंबनाची जाणीव निर्माण करणे तसेच सामाजिक बांधिलकी दृढ करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आरोग्य विभागातील अरुणाताई पारधे उपस्थित होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता वसंतराव पारधी, पोलीस उपनिरीक्षक मन्सूर सय्यद, बांधकाम विभागातील अभियंता पुनम प्रकाश थोरात तसेच महाराष्ट्र शासनाच्या कुष्ठरोग कार्यालयातील अवैद्यकीय सहाय्यक सुनील पवार उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी स्वागत करून महिला सशक्तीकरणाच्या कार्यात योगदान देणाऱ्या महिलांचा गौरव करण्यात आला. यावेळी उपस्थितांनी महिला शिक्षण, स्वावलंबन आणि सामाजिक सहभाग यांचे महत्त्व अधोरेखित केले.

अध्यक्षीय भाषणात अरुणाताई पारधे यांनी महिलांच्या जीवनात शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. त्या म्हणाल्या की, स्त्री शिक्षण हा केवळ अधिकार नसून समाजाच्या प्रगतीसाठी अत्यंत आवश्यक घटक आहे. त्यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि महात्मा ज्योतीराव फुले यांच्या कार्याचा उल्लेख करत स्त्रियांसाठी शिक्षणाचा मार्ग खुला करण्यासाठी त्यांनी केलेल्या संघर्षाची आठवण करून दिली. स्त्री शिक्षणामुळे महिलांमध्ये आत्मविश्वास वाढतो, समानतेची जाणीव निर्माण होते आणि समाजात सन्मानाने जगण्याची ताकद मिळते. त्यामुळे प्रत्येक मुलीला शिक्षणाची संधी मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

पीपल्स हेल्पलाईनचे प्रकाश थोरात यांनी आपल्या भाषणात महात्मा ज्योतीराव फुले यांच्या कार्याचा संदर्भ दिला. त्यांनी सांगितले की, ज्योतीराव फुले यांनी अहमदनगर येथे मिशनरी शिक्षिका मिस फरार यांच्या मुलींच्या शाळेला भेट दिली होती. त्या शाळेतील शिक्षणपद्धती पाहून ते प्रभावित झाले आणि त्यातूनच पुण्यात मुलींसाठी शाळा सुरू करण्याची प्रेरणा त्यांना मिळाली. यानंतर त्यांनी आपल्या पत्नी सावित्रीबाई फुले यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले आणि त्यांच्याच माध्यमातून मुलींच्या शिक्षणाची चळवळ सुरू झाली. या ऐतिहासिक कार्यामुळे भारतीय समाजात स्त्री शिक्षणाला नवी दिशा मिळाली, असे त्यांनी सांगितले.

पोलीस उपनिरीक्षक मन्सूर सय्यद यांनी महिला सशक्तीकरणाचे महत्त्व विशद केले. महिलांनी शिक्षण, स्वावलंबन आणि कायद्याचे ज्ञान यांचा आधार घेत स्वतःला सक्षम बनवावे, असे त्यांनी सांगितले. समाजात महिलांनी भीती न बाळगता आपल्या हक्कांसाठी उभे राहणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमादरम्यान आयडियल हेल्पिंग हॅण्ड फाउंडेशनच्या संस्थापक सदस्य कुंदबाला मोहन गायकवाड यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच डॉ. मनीषा लक्ष्मण यांनी महिलांना प्रेरणादायी मार्गदर्शन करत आरोग्य, स्वावलंबन आणि जागरूकतेविषयी महत्त्वपूर्ण विचार मांडले. यावेळी संस्थेमार्फत स्वावलंबी बनविण्यात आलेल्या मुलींचा विशेष सन्मान करण्यात आला. तसेच झोपडपट्टी परिसरात कार्यरत स्नेहालय संचालित बालभवन येथील समाजसेविका महिलांचाही गौरव करण्यात आला. कार्यक्रमानिमित्त उपस्थित सर्व महिलांना भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी आयडियल हेल्पिंग हॅण्ड फाउंडेशनने गेल्या पाच वर्षांत मुलींसाठी राबविलेल्या कौशल्य विकास, मार्गदर्शन आणि सामाजिक पाठबळ या उपक्रमांचा आढावा सादर करण्यात आला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रकाश थोरात व डेव्हिड अवचित यांचे सहकार्य लाभले. यावेळी संस्थेचे निर्मला केदारी, मनीषा शिंदे, उज्वला गायकवाड, शिवाजी जाधव, वैशाली पार्ले, प्रशांत भोंग, सुनील बोर्डे आदी उपस्थित होते. हेल्पिंग हॅण्ड फाउंडेशनच्या प्रमुख निर्मला केदारी यांनी आभार मानले.


### जाहीर नोटीस

प्रति. **सौ.जया राम चव्हाण**
रा.भोपळेगल्ली, माळीवाडा
ता.जि.अहिल्यानगर } : अर्जदार
विरुध्द
अधिकारी जन्म मृत्यू नोंदणी विभाग.
अहिल्यानगर महानगरपालिका,अहिल्यानगर } : सामनेवाले

ज्याअर्थी, अर्जदार सौ.जया राम चव्हाण यांनी त्यांचा मुलगा नामे **सोमनाथ राम चव्हाण** यांचा जन्म दि.१५/०८/२००९ रोजीच्या जन्म नोंदीबाबत सदरचा अर्ज जन्म–मृत्यू नोंदणी अधिनियम. १९६९ चे **कलम १३ (३) अन्वये मा.अपर तहसिलदार अहिल्यानगर यांचे न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार** सौ.जया राम चव्हाण यांनी त्यांचा मुलगा नामे सोमनाथ राम चव्हाण यांचा जन्म दि.१५/०८/२००९ रोजी जन्म झालेला आहे. त्यांचे जन्म नोंद प्रतिवादी यांचेकडे होऊन तसे जन्म प्रमाणपत्र मिळणेकरिता सदरचा अर्ज मे. न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी, सौ.जया राम चव्हाण यांनी त्यांचा मुलगा नामे **सोमनाथ राम चव्हाण** यांचा जन्म दि.१५/०८/२००९ रोजी जन्म झालेला नाही, असे जर कोणाचे म्हणणे असल्यास, त्यांनी या जाहीर नोटीस प्रसिध्दीचे दिनांकापासून १५ दिवसांचे आत आपली लेखी हरकत कागदपत्र पुरावे मा. अपर तहसिलदार अहिल्यानगर यांचे कार्यालयात सादर करावे. तसेच मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर कार्यालय अर्जदाराचा पुरावा घेऊन वर नमूद अर्जदार सौ. जया राम चव्हाण यांनी त्यांचा मुलगा नामे **सोमनाथ राम चव्हाण** यांचा जन्म दि. १५/०८/२००९ रोजीच्या जन्माची नोंद सामनेवाला यांचेकडे घेऊन तसा दाखला अर्जदार यांना देण्याचा हुकुम करतील. तद्नंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार गृहीत धरली जाणार नाही. येणेप्रमाणे आज दिनांक २३/०१/२०२६ आज रोजी जाहीर नोटीस माझे सही व शिक्यानिशी दिली असे.

**स्वप्निल ढवळे**
अपर तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अहिल्यानगर

### जाहीर नोटीस

प्रति. **श्री.इरफान मोहमंद हुसेन शेख**
रा.१६६६, जलाली मस्जिदजवळ, कामाटीपुरा,
झेंडीगेट, ता.जि.अहिल्यानगर } : अर्जदार
विरुध्द
अधिकारी जन्म मृत्यू नोंदणी विभाग.
अहिल्यानगर महानगरपालिका,अहिल्यानगर } : सामनेवाले

ज्याअर्थी, अर्जदार श्री.इरफान मोहमंद हुसेन शेख यांनी सदरचा अर्ज जन्म–मृत्यू नोंदणी अधिनियम. १९६९ चे **कलम १३ (३) अन्वये मा.अपर तहसिलदार अहिल्यानगर यांचे न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार** श्री.इरफान मोहमंद हुसेन शेख यांचा दि.१०/०१/१९७० रोजी जन्म झालेला आहे. त्यांची जन्म नोंद प्रतिवादी यांचेकडे होऊन तसे जन्म प्रमाणपत्र मिळणेकरिता सदरचा अर्ज मे. न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी, श्री.इरफान मोहमंद हुसेन शेख यांचा दि. १०/०१/१९७० रोजी जन्म झालेला नाही असे जर कोणाचे म्हणणे असल्यास, त्यांनी या जाहीर नोटीस प्रसिध्दीचे दिनांकापासून १५ दिवसांचे आत आपली लेखी हरकत कागदपत्र पुरावे मा. अपर तहसिलदार अहिल्यानगर यांचे कार्यालयात सादर करावे. तसेच मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर कार्यालय अर्जदाराचा पुरावा घेऊन वर नमूद अर्जदार श्री.इरफान मोहमंद हुसेन शेख यांचा दि.१०/०१/१९७० रोजीच्या जन्माची नोंद सामनेवाला यांचेकडे घेऊन तसा दाखला अर्जदार यांना देण्याचा हुकुम करतील. तद्नंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार गृहीत धरली जाणार नाही. येणेप्रमाणे आज दिनांक ०६/०३/२०२६ रोजी जाहीर नोटीस माझे सही व शिक्यानिशी दिली असे.

**स्वप्निल ढवळे**
अपर तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अहिल्यानगर

### जाहीर नोटीस

प्रति. **श्री.आसीफ मोहंमद हुसेन खान**
रा.डावरेगल्ली,
ता.जि.अहिल्यानगर } : अर्जदार
विरुध्द
अधिकारी जन्म मृत्यू नोंदणी विभाग.
अहिल्यानगर महानगरपालिका,अहिल्यानगर } : सामनेवाले

ज्याअर्थी, अर्जदार श्री. आसीफ मोहमंद हुसेन खान यांनी सदरचा अर्ज जन्म–मृत्यू नोंदणी अधिनियम. १९६९ चे **कलम १३ (३) अन्वये मा.अपर तहसिलदार अहिल्यानगर यांचे न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार** श्री. आसीफ मोहमंद हुसेन खान यांचा दि.०४/०६/१९६२ रोजी जन्म झालेला आहे. त्यांची जन्म नोंद प्रतिवादी यांचेकडे होऊन तसे जन्म प्रमाणपत्र मिळणेकरिता सदरचा अर्ज मे. न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी, श्री.आसीफ मोहमंद हुसेन खान यांचा दि.०४/०६/१९६२ रोजी जन्म झालेला नाही, असे जर कोणाचे म्हणणे असल्यास, त्यांनी या जाहीर नोटीस प्रसिध्दीचे दिनांकापासून १५ दिवसांचे आत आपली लेखी हरकत कागदपत्र पुरावे मा. अपर तहसिलदार अहिल्यानगर यांचे कार्यालयात सादर करावे. तसेच मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर कार्यालय अर्जदाराचा पुरावा घेऊन वर नमूद अर्जदार श्री.आसीफ मोहमंद हुसेन खान यांचा दि.०४/०६/१९६२ रोजीच्या जन्माची नोंद सामनेवाला यांचेकडे घेऊन तसा दाखला अर्जदार यांना देण्याचा हुकुम करतील. तद्नंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार गृहीत धरली जाणार नाही. येणेप्रमाणे आज दिनांक ०६/०३/२०२६ रोजी जाहीर नोटीस माझे सही व शिक्यानिशी दिली असे.

**स्वप्निल ढवळे**
अपर तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अहिल्यानगर


मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# चिमुकल्यांच्या आनंद मेळाव्यात साडे चौदा हजारांची उलाढाल

## ओंकारनगर शाळेत बाल आनंद मेळावा

नगर – अहमदनगर महानगरपालिकेच्या केडगाव येथील प्रथम आयएसओ मानांकन प्राप्त ओंकारनगर प्राथमिक शाळेत आयोजित बाल आनंद मेळाव्यात विद्यार्थ्यांनी विक्रेते बनत खरेदी विक्रीचा अनुभव घेत साडे चौदा हजार रुपयांची कमाई केली. पाणीपुरी, पापडभाजी, वडापाव, भेळ,समोसे, मसाला ताक, पापडी चाट, लिंबू शरबत, पायनापल शरबत, लस्सी, डाळीचे लाडू, पावभाजी, हरभरा उसळ चाट, रसना, फ्रुट स्टॉल, पॅटीस, गुलाबजाम, मंचुरियन, सोयाबीन चिली, कस्टर्ड, मँगो ज्यूस, शालेय परसबागेतील सेंद्रिय पद्धतीने पिकवलेला शेवगा, कोथिंबीर, पालक, टोमॅटो, बटाटे, गवती चहा, फ्लॉवर, कोबी, लिंबू, कढीपत्ता इत्यादी भाजीपाला, खेळणी इत्यादी पदार्थांचे स्टॉल विद्यार्थ्यांनी पालकांच्या मदतीने लावले होते. उपस्थित पाहुणे, विद्यार्थी, पालक, नागरिक यांनी विद्यार्थ्यांच्या स्टॉलवर भेट देत खरेदीचा मनसोक्त आनंद लुटला.

अध्यक्षस्थानी नगरसेवक अमोल येवले होते. नगरसेवक मयुर बांगरे, नगरसेवक जालिंदर कोतकर, नगरसेवक सुमित लोंढे, श्रीराम जोशी, संदिप जाधव, भैरवनाथ सायकल सेंटरचे भाऊसाहेब बनकर, अहिल्यानगर आमीचे अध्यक्ष जयद्रथ खाकाळ, इनरव्हील क्लबच्या माजी अध्यक्षा नंदा यादव, नपा व मनपा शिक्षक संघ राज्य सचिव अरुण पवार, विक्रम लोखंडे, उज्ज्वल क्लासेसच्या उज्ज्वला घोडके, शिक्षक संदिप राजळे, युवराज मोरे, आरोग्यसेविका ज्योती काळे, मुख्याध्यापक भाऊसाहेब कबाडी, सहशिक्षक शिवराज वाघमारे, सहशिक्षिका वृषाली गावडे यांची कार्यक्रमासाठी उपस्थिती होती.



अहमदनगर महानगरपालिकेच्या केडगाव येथील प्रथम आयएसओ मानांकन प्राप्त ओंकारनगर प्राथमिक शाळेत आयोजित बाल आनंद मेळाव्याचे उद्घाटन करताना नगरसेवक अमोल येवले आदी.

भैरवनाथ सायकल सेंटर केडगावचे सोमनाथ बनकर यांनी ओंकारनगर शाळेची इयत्ता पाचवीची विद्यार्थीनी गितांजली उमाप हिस सायकल भेट दिली. दरवर्षी सोमनाथ बनकर यांच्यावतीने ओंकारनगर शाळेतील एका गरजू विद्यार्थ्यास सायकल भेट देण्यात येते.

विद्यार्थ्यांना खरेदी–विक्री, नफा–तोटा समजावा, विद्यार्थ्यांचे व्यावहारिक ज्ञान वाढावे, गतीने आकडेमोड करता यावी, नाणी–नोटा यांचा व्यवहार समजावा म्हणून शाळेत दरवर्षी बाल आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात येते. तसेच शालेय परसबागेत सेंद्रिय पद्धतीने पिकवलेला भाजीपाला बाल आनंद मेळाव्यात विक्रीसाठी ठेवण्यात येतो, असे मुख्याध्यापक भाऊसाहेब कबाडी यांनी आपल्या प्रास्ताविकातून सांगितले.

महानगरपालिका शाळांमध्ये दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या कौशल्यांचे शिक्षण बालवयातच दिले जाते याचा विशेष आनंद आहे. तसेच ओंकारनगर शाळेत सातत्याने नवनवीन उपक्रम राबवले जातात.तसेच ओंकारनगर शाळेची ओळख जिल्ह्यातच नाही तर राज्यात झाली आहे, असे आमीचे अध्यक्ष जयद्रथ खाकाळ आपल्या मनोगतात म्हटले.

विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच व्यावहारिक ज्ञान मिळावे यासाठी बाल आनंद मेळावा आयोजित करणे हा ओंकारनगर शाळेचा स्तुत्य उपक्रम असल्याचे नगरसेवक मयुर बांगरे आपल्या मनोगतात म्हणाले.

ओंकारनगर शाळा ही अहिल्यानगर महानगरपालिकेची एक आदर्श शाळा आहे. शाळेच्या सर्व अडचणी आम्ही सर्व नगरसेवक मिळून सोडवू, असे नगरसेवक जालिंदर कोतकर म्हणाले.

ओंकारनगर शाळेत नेहमीच नवनवीन उपक्रम राबवले जातात. इयत्ता पहिलीपासून विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण मिळणे काळाची गरज आहे. ओंकारनगर शाळेत शालेय शिक्षणाबरोबरच परसबाग निर्मिती व बाल आनंद मेळाव्याच्या माध्यमातून व्यावसायिक शिक्षण दिले जाते हे उल्लेखनीय आहे, असे नगरसेवक अमोल येवले आपल्या अध्यक्षीय मनोगतातून म्हणाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अरुण पवार यांनी केले. मुख्याध्यापक भाऊसाहेब कबाडी यांनी उपस्थितांचे आभार मानले. सहशिक्षक शिवराज वाघमारे, सहशिक्षिका वृषाली गावडे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा पल्लवी भुजबळ, उपाध्यक्षा दुर्गा घेवारे, प्रियंका लोळगे, पुनम बडे, कवित वाघमारे, दिपाली साळवे यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

## विवाहाचा प्रस्ताव धुडकावल्याने तरुणीचा विनयभंग; गुन्हा दाखल

नगर – शहरातील कायनेटिक चौक परिसरातील एका २३ वर्षीय तरुणीचा पाठलाग करून तिचा विनयभंग केल्याची घटना उघडकीस आली आहे. लग्नास नकार दिल्याच्या रागातून आरोपीने केवळ तरुणीचा हात धरून तिला धमकावलेच नाही, तर तिच्या नियोजित सासरच्या मंडळींना फोन करून तिचे लग्नही मोडले. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संबंधित तरुणी गजराज हॉटेलसमोरून घरी जात असताना एका तरुणाने तिला अडवले. आरोपीने यापूर्वी तिला लग्नाची मागणी घातली होती, मात्र तरुणीच्या कुटुंबीयांनी त्यास स्पष्ट नकार दिला होता. याचाच राग मनात धरून आरोपीने सार्वजनिक ठिकाणी तरुणीचा हात धरून लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले. तू दुसऱ्या कोणाशी लग्न केले तर याद राख, अशी धमकीही त्याने भररस्त्यात दिली. इतक्यावरच न थांबता, आरोपीने तरुणीच्या होणाऱ्या सासरच्या मंडळींना संपर्क साधला. माझे आणि तिचे प्रेमसंबंध आहेत, तुम्ही मुलाचे लग्न तिच्याशी करू नका, असे खोटे सांगून त्याने तरुणीचे ठरलेले लग्न मोडले. पीडित तरुणीने दिलेल्या तक्रारीवरून कोतवाली पोलिसांनी तरुणाविरुद्ध विनयभंग आणि धमकावल्याप्रकरणी गुन्हा नोंदवला आहे. पुढील तपास महिला पोलीस हवालदार रोहिणी दरंदले करत आहेत.

# मनपाच्या शाळा क्र. ४ रेल्वे स्टेशन विद्यालयात स्नेहसंमेलन उत्साहात

## पारितोषिक वितरण सोहळा

नगर – अहिल्यानगर महानगरपालिकेच्या शाळा क्रमांक ४ रेल्वे स्टेशन विद्यालयाचा वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण सोहळा मंगळवारी उत्साहात झाला. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली.



अहिल्यानगर महानगरपालिकेच्या शाळा क्रमांक ४ रेल्वे स्टेशन विद्यालयाचा वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात झाला.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून महापौर सौ. ज्योतीताई गाडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आपल्या भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांनी मोबाईलचा अतिरेक टाळावा तसेच त्याचे दुष्परिणाम समजून घ्यावेत, असे सांगितले.

शाळेचे मुख्याध्यापक विजय घिगे यांनी प्रास्ताविक करत शाळेचा वार्षिक अहवाल वाचन केला. अहवालातून शाळेत राबविण्यात येणाऱ्या विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांची तसेच विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेतील प्रगतीची माहिती त्यांनी दिली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगरसेविका गीतांजली काळे होत्या. अध्यक्षीय भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच विविध कला आणि गुण जोपासावेत, असे प्रतिपादन केले. गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिकांचे वितरण करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांनी शेतकरी गीत, कोळीगीत, देशभक्तीपर गीते, हिंदी चित्रपट गीते, विनोदी नाटिका तसेच भारुड अशा विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची रंगतदार सादरीकरणे केली.

या कार्यक्रमास नगरसेवक मयूर बांगरे, दत्तात्रय गाडळकर, अश्विनी लोंढे, जालिंदर कोतकर, पौर्णिमा गव्हाळे, शिक्षण विभागाचे प्रशासन अधिकारी जुबेर पठाण, वृद्धेश्वर अर्बन मल्टीस्टेटचे संचालक अजय गावडे, सप्तरंग प्रिंटवर्ल्डचे संचालक नंदेश शिंदे, विस्तार अधिकारी सखाराम कवडे, अशोक धसाळ, माजी नगरसेवक विजय गव्हाळे, संभाजी पवार, दीपक लोंढे, गणेश लोंढे, सुमित लोंढे, विजय गायकवाड, संदेश इंगळे, अमोल रणदिवे, कानिफनाथ डेकोरेटर्सचे संचालक सूरज कोके, प्राचार्य विकास गवळी तसेच विविध शाळांचे मुख्याध्यापक अक्षय सातपुते, शशिकांत वाघुलकर, भाऊसाहेब कबाडी, अरुण पवार, अनिल बडे आदी उपस्थित होते. याशिवाय सहशिक्षक अमोल बोठे, युवराज मोरे, शितल गवळी, प्रियांका पुंड, अविनाश साठे तसेच पालक व ग्रामस्थ उपस्थित होते.

सूत्रसंचालन विठ्ठल आठरे, दिपाली नवले व मनिषा शिंदे यांनी केले, तर आभार प्रदर्शन भारती कवडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी वर्षा गायकवाड, मनिषा गिरमकर, दिप्ती दरेकर, ज्योती बोलके, भारती परदेशी तसेच CSRD चे विद्यार्थी अमित गायकवाड, मानसी साबळे आणि अपेक्षा बेलेकर यांनी योगदान दिले.

